मराठी अस्मितेचा बुलंद आवाज.
https://www.vruttamanas.in/
# वृत्तमानस
आर. एन. आय क्र. - ६५६०९/९६
किंमत : ३ रुपये
मुंबई/ पालघर
मुंबई, रविवार, ६ ऑक्टोबर २०२४ | वर्ष- २९ | अंक - १०६ | पाने- ८

## विकासकामे थांबवणाऱ्यांना सत्तेपासून लांब ठेवा

प्रतिनिधी
ठाणे

आचारसंहिता लागण्याच्या आधी नेत्यांनी विविध विकासकामांच्या उद्घाटनांचा धडाका लावला आहे. या पार्श्वभूमीवरच पंतप्रधान नरेंद्र मोदी आज महाराष्ट्र दौऱ्यावर होते. यावेळी पंतप्रधान मोदी यांच्या हस्ते ठाण्यात विविध विकास कामांचं उद्घाटन पार पडलं. यावेळी बोलताना त्यांनी महाविकास आघाडीवर हल्लाबोल केला. "महाविकास आघाडीने विकासकामे रोखण्याचा प्रयत्न केला, पण आता विकासकामे थांबवणाऱ्यांना सत्तेपासून लांब ठेवण्याचं काम करा", असं पंतप्रधान मोदी यांनी म्हटलं आहे.

"महाराष्ट्र विकासाच्या वाटेवर नेण्याचं काम आम्ही केलं आहे. असे अनेक प्रकल्प आहेत ते आम्ही मार्गी लावले आहेत. आता ते जर मोजायला गेलो तर दिवस कमी पडेल", असं म्हणत पंतप्रधान मोदी यांनी काँग्रेसवर टीका केली. "महाविकास आघाडीला संधी मिळाली की ते विकासाचे काम थांबवण्याचे काम करतात. मुंबई मेट्रो हे देखील त्याचच



### ठाण्यात विविध विकासकामांचं उद्घाटन

### भूमिगत मेट्रो प्रकल्पाचे लोकार्पण

एक उदाहरण आहे. मविआला फक्त विकास थांबवण्याचं काम येतं. मात्र, विकासकाम थांबवणाऱ्यांना आता सत्तेपासून लांब ठेवा. अडीच वर्ष काम थांबवल्यामुळे मेट्रोचा खर्च 14 हजार कोटींनी वाढला. मग हे पैसे कोणाचे होते? सर्व सामान्य नागरिकांनी भरलेला टॅक्सचे होते", असा हल्लाबोल पंतप्रधान मोदी यांनी महाविकास आघाडीवर केला.

## आरक्षणाची 50 टक्क्यांची मर्यादा हटवणार

प्रतिनिधी
कोल्हापूर

दलित, मागास, वंचित वर्गातील लोकांना उद्योग, व्यवसाय, न्यायालयासह कुठेही फारशी संधी दिली जात नाही. सरकारी संस्थाच्या खाजगीकरणामुळे आरक्षण संपवले जात आहे. हे चित्र बदलण्यासाठी संविधानाचे रक्षण महत्वाचे असून संविधानाचे रक्षण करायचे असेल तर सर्वात आधी आरक्षणाची 50 % ची मर्यादा काढून टाकावी लागणार आहे, इंडिया आघाडी ही मर्यादा हटवेल आणि लोकसभा व राज्यसभेत जातनिहाय जनगणनाही मंजूर करू अशी घोषणा लोकसभेतील विरोधी पक्षनेते खा. राहुल गांधी यांनी केली.

कोल्हापुरातील संविधान सन्मान संमेलनात खासदार राहुल गांधी बोलत होते, ते पुढे म्हणाले की, आज कोणत्या जातीची किती लोकसंख्या आहे हे ठोसपणे सांगता येत नाही त्यासाठी जातनिहाय जनगणना करणे गरजेचे आहे. जातनिहाय जनगणना म्हणजे एक्सरे आहे, एक्सरे काढल्यानंतर समस्या काय आहे ते समजेल व नंतर त्यावर उपाय करता




### कोल्हापुरातील संविधान सन्मान संमेलनात घोषणा

येईल पण जातनिहाय जनगणेला भाजपा, आरएसएसचा विरोध आहे. देशातील 90 टक्के जनतेला खरी माहिती कळू नये यासाठी ते विरोध करत आहेत. परंतु देशातील या ९० टक्के लोकांच्या हितासाठी जातनिहाय जनगणना लोकसभा व राज्यसभेत मंजूर करुन घेऊ आणि कोणतीही शक्ती याला रोखू शकत नाही.

पान 3 वर




## नागपुरात आशियातील पहिला 4 स्तरीय डबल डेकर उड्डाणपूल

**नागपूर ।** जे देशात नाही, आशियात नाही ते नागपूरमध्ये आहे. अजनी चौक ते एअरपोर्ट हा डबल डेकर उड्डाणपूल, पूर्व नागपूरच्या पारडीमध्ये असणारा डबल-डेकर पूल आणि आता नागपुरातील एलआयसी ते ऑटोमॅटिव्ह चौक पर्यंत असलेला

### गडकरींच्या हस्ते डबल डेकर उड्डाणपूलाचे दिमाखात लोकार्पण

तिसरा डबल डेकर पूल आशियातील चार स्तरीय वाहतूक असणारा पहिला डबल डेकर पूल ठरला आहे. या पुलामुळे कामठी आणि छिंदवाडा रोडवरील वाहतूक सुरळीत तसेच अपघात मुक्त होईल, असे प्रतिपादन केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी केले.

एलआयसी चौकामध्ये आयोजित या उड्डाणपुलाच्या लोकार्पण कार्यक्रमाला ते संबोधित करत होते. याप्रसंगी नितीन गडकरी यांनी या उड्डाणपुलासाठी भूसंपादन करण्यासाठी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नगरोत्थान अंतर्गत निधी मिळवून दिल्याबद्दल त्यांचे आभार मानले.



## तलासरीत उभारले 'वेस्ट वंडर पार्क'

**कासा :** स्वच्छता पंधरवड्यानिमित्त २० सप्टेंबर ते २ ऑक्टोबरदरम्यान जिल्ह्यात जनजागृती आणि विविध मोहिमा राबवण्यात आल्या. स्थानिक स्वराज्य संस्थांनी आपल्या कार्यक्षेत्रात उपक्रम राबवून नागरिकांमध्ये स्वच्छतेबाबत जागरूकता निर्माण केली. यामध्ये तलासरी नगरपंचायतीकडून राबवलेला 'वेस्ट वंडर पार्क' टाकाऊपासून टिकावू हा उपक्रम विशेष लक्षवेधी ठरला आहे. तलासरी नगरपंचायतीच्या हद्दीत स्वच्छता पंधरवड्याअंतर्गत विविध उपक्रम राबवण्यात आले. शाळा व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छतेचे महत्त्व पटवून देण्यासाठी जनजागृती मोहिमा, मॅरेथॉन आणि चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यात आल्या. या स्पर्धकांमधून विजयी स्पर्धकांना बक्षिसे वितरण केले. याच उपक्रमांतर्गत नगरपंचायतीने 'टाकाऊपासून टिकावू' या संदेशाचा प्रसार करण्यासाठी टाकाऊ प्लास्टिक आणि काचेच्या बाटल्यांचा वापर करून तलासरी नगरपंचायतीसमोरील मोकळ्या जागेत 'वेस्ट वंडर पार्क' तयार केले आहे. उद्यानामध्ये विविध झाडांच्या रोपांची लागवडही करण्यात आली आहे. महात्मा गांधी जयंतीच्या दिवशी 'वेस्ट वंडर पार्क'चे लोकार्पण करण्यात आले. यावेळी मॅरेथॉन आणि चित्रकला स्पर्धेतील विजेत्यांचा; तसेच नगरपंचायत स्वच्छता कर्मचाऱ्यांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाला नगरपंचायत मुख्याधिकारी भूषण माने, नगराध्यक्ष सुरेश भोये, उपनगराध्यक्ष सुभाष दुमाडा, नगरसेवक आणि कर्मचारी उपस्थित होते

## थोडक्यात

### कंत्राटी कामगारांचे प्रश्न महाराष्ट्र श्रमिक सभेतर्फे रविवारी मेळावा

**मुंबई:** महाराष्ट्र श्रमिक सभा या कामगार संघटनेच्या वतीने, रविवार ६ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ५.३० वाजता मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालयाच्या गावस्कर सभागृहात कंत्राटी कामगारांचे प्रश्न आणि राजकीय पक्षांची भूमिका या विषयाच्या अनुषंगाने कामगार मेळावा आयोजित करण्यात आला आहे. ज्येष्ठ कामगार नेते सूर्यकांत बागल तसेच काँग्रेस पक्षातर्फे हुसेन दलवाई, राष्ट्रवादी काँग्रेसतर्फे विद्या चव्हाण, जनता दलातर्फे प्रभाकर नारकर, शेतकरी कामगार पक्षातर्फे ॲड. राजेंद्र कोरडे, समाजवादी पक्षाचे राहुल गायकवाड आदी आपापल्या पक्षाची भूमिका मांडणार आहेत, असे महाराष्ट्र श्रमिक सभेचे सरचिटणीस केतन कदम यांनी सांगितले.

### विरार-ग्लोबल सिटीची तहान भागणार

**विरार:** विरार पश्चिम येथील ग्लोबल सिटीला 'विजयादशमी'च्या मुहूर्तावर पाणी देण्याचा निर्णय अखेर पालिकेने घेतला आहे. त्या संदर्भात आमदार क्षितिज ठाकूर यांनी आवश्यक कामे आणि दुरुस्तीच्या सूचना अधिकाऱ्यांना दिल्या आहेत. त्यामुळे १५ हजारांहून अधिक सदनिकांत राहणाऱ्या तब्बल ५० हजार रहिवाशांची पाणीसमस्या निकाली निघणार आहे. .फेब्रुवारीपासूनच ग्लोबल सिटीला पाणीपुरवठा करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. या योजनेचा नारळ अनेक नागरिकांच्या उपस्थितीत आमदार हितेंद्र ठाकूर व क्षितिज ठाकूर यांनीच वाढवला होता. मात्र, दरम्यानच्या काळात चंदनसार येथून ग्लोबल सिटीपर्यंत येणाऱ्या जलवाहिनीवर तब्बल १३ गळती सापडले होते. त्यानंतरही जलवाहिनी सातत्याने नादुरुस्त होत होती. या जलवाहिनीवरील समस्या शोधण्यात, त्यांच्या दुरुस्ती आणि बदलीत वेळ गेल्याने ग्लोबल सिटीला पाणी पुरवठा करण्यास विलंब झाला, असा खुलासा पालिकेने नालासोपारा विधानसभेचे आमदार क्षितिज ठाकूर यांच्यासोबत झालेल्या बैठकीत केला आहे. पालिका अधिकाऱ्यांसोबतच्या बैठकीत ठाकूर यांनी कामाचा विस्तृत आढावा घेतला.

### वैतरणा खाडीवर बुलेट ट्रेनसाठी पूल उभारण्याचे काम सुरू

**वसई :** मुंबई-अहमदाबाद या दोन महत्त्वाच्या शहरांना जोडणाऱ्या ५०८ किमी लांबीच्या बुलेट ट्रेन प्रकल्पाचे काम प्रगतीपथावर आहे. या बुलेट ट्रेनचा मार्ग पालघर जिल्ह्यातून जातो. त्यामुळे पालघर जिल्ह्यात वैतरणा खाडीवर त्यासाठी २. ३२ किलोमीटर लांबीचा पूल बांधण्यात येणार आहे. या पुलाच्या निर्मितीच्या कामासाठी खाडीवर एका तात्पुरत्या पुलाच्या उभारणीचे काम सुरू करण्यात आले आहे.

**महत्त्वपूर्ण निवेदन**

वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीचा मजकूर स्वीकारण्यापूर्वी काळजी घेतली जात असली तरी त्याच्या आशयाची पडताळणी करणे शक्य होत नाही. तरी आपल्या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील जाहिरातदार कंपन्या, सहयोगी संस्था अथवा व्यक्तीबरोबर व्यवहार केल्यामुळे कोणत्याही स्वरूपाचे नुकसान व हानी झाल्यास त्यासाठी अथवा संबंधित जाहिरातीतील आशयासाठी मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.ला जबाबदार ठरविता येणार नाही. त्यामुळे जाहिरातदारांना कोणतीही रक्कम प्रेषित करण्यापूर्वी अथवा त्याच्याबरोबर कोणत्याही स्वरूपाचे संमतिपत्र कार्यसिद्ध करण्यापूर्वी अथवा एखाद्या जाहिरातीवर आधारित कोणतीही कृती करण्यापूर्वी वाचकांनी आवश्यकती चौकशी करण्याची खबरदारी घ्यावी.

# वालीव प्रभागात 22,700 चौ.फुट अनधिकृत बांधकाम निष्कसीत

प्रतिनिधी
■ वसई

वसई-विरार शहर महानगरपालिका अंतर्गत प्रभाग समिती 'जी' वालीवमध्ये गुरुवारी अनधिकृत बांधकामांवर धडक कारवाई करण्यात आली. आयुक्त आणि अतिरिक्त आयुक्त (दक्षिण) यांच्या मार्गदर्शनाखाली, उप-आयुक्त अजित मुठे (अतिक्रमण विभाग) यांच्या आदेशानुसार ही मोहिम राबवण्यात आली.





या मोहिमेअंतर्गत चिंचोटी गावातील सर्वे नं. ३२ आणि ३३ येथे ५ अनधिकृत इंडस्ट्रीयल गाळ्यांचे अंदाजे १२,५०० चौ.फुटाचे पत्रा आणि वीट बांधकाम निष्कासीत करण्यात आले. तसेच जुचंद्र, परेरा नगर येथील सर्वे नं. २६३ मध्ये १० रूम आणि २४ पाया यांचे अंदाजे १०,२०० चौ.फुटाचे अनधिकृत बांधकाम हटविण्यात आले.

सहा. आयुक्त निता कोरे, कनिष्ठ अभियंता कौस्तुभ तामोरे आणि इतर अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत एकूण २२,७०० चौ.फुटाचे अनधिकृत बांधकाम निष्कासीत करण्यात आले.

# मुलं पळवणारी सांगलीची टोळी पालघरमध्ये जेरबंद

## दोन पुरुषांसह चार महिलांना बेड्या



प्रतिनिधी
■ पालघर

डहाणू तालुक्यातील चारोटी येथे मुले पळवून आणणाऱ्या एका टोळीला पोलिसांनी अटक केली आहे. कल्याण रेल्वे स्थानक परिसरातून टोळीने चिमुकल्यांना पळवून आणले असून याविषयी कल्याण येथील महात्मा फुले पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल आहे.

चारोटी येथे गुरुवारपासून थांबलेल्या टोळीमधील पुरुष आणि महिला मराठी आणि लहान मुले हिंदी बोलत असल्यामुळे परिसरातील तरुणांना यांचा संशय होता. दरम्यान टोळीमध्ये शुक्रवारी आपापसात वाद निर्माण होऊन हाणामारी सुरू होती. यावेळी परिसरातील तरुणांनी भांडणे सोडवत चौकशी केली असता टोळीतील लोक मराठीमध्ये संभाषण करत असून लहान मुले हिंदी बोलत असल्यामुळे तरुणांना संशय आला. तरुणांनी अधिक चौकशी केली असता टोळीतील महिलांनी ही मुले अनाथ असून आम्ही त्यांचे पालन पोषण करत असल्याचे सांगत टाळाटाळ करण्याचा प्रयत्न केला. तरुणांनी मुलांना विश्वासात घेत विचारपूस केली असता मुलांनी आम्हाला पळवून आणले असल्याची माहिती दिली. दरम्यान याठिकाणी गर्दी झाल्यामुळे गस्तीवर असलेले कासा पोलीस कर्मचारी याठिकाणी आले. तरुणांनी घटनेची माहिती पोलिसांना देत संशय व्यक्त केल्यानंतर पोलिसांनी टोळीतील सदस्यांची आणि मुलांची चौकशी केल्यावर सर्व प्रकार उघडकीस आला आहे. यांनतर मुलांनी दिलेल्या फोन नंबर वर संपर्क करत पोलिसांनी मुलांच्या कुटुंबीयांना आणि पोलिसांना याविषयी माहिती दिली असता सूरज मिश्रा (८) आणि सत्यम मिश्रा (५) ही दोन मुले कल्याण रेल्वे स्थानक परिसरातून हरवल्याची तक्रार महात्मा फुले पोलीस ठाण्यात दाखल असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. याप्रकरणी मुले पळवणाऱ्या टोळीतील विनोद गोसावी, आकाश गोसावी, अंजली गोसावी आणि चंदा गोसावी राहणार कल्याण, जिल्हा ठाणे यांना अटक केली आहे. कल्याण पोलिसांशी संपर्क झाल्यानंतर पालघर पोलिसांतील वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली टोळी आणि मुलांना कल्याण पोलिसांच्या ताब्यात देण्यात आल्याची माहिती कासा पोलीस ठाणे प्रभारी अविनाश मांदळे यांनी दिली.

# मोखाडा तालुक्यातील कामगारांना सेफ्टीकिट, गृहपयोगी वस्तूंचे वाटप



प्रतिनिधी
■ मोखाडा

मोखाडा तालुक्यातील नोंदणी केलेल्या कामगारांना महाराष्ट्र राज्य बांधकाम फेडरेशन(आयटक) च्या वतीने शेकडो बांधकाम कामगारांना कल्याणकारी मंडळामार्फत सेफ्टी किट, गृहपयोगी भांडी(किचन सेट) वाटप करण्यात आले .

यावेळी महाराष्ट्र राज्य बांधकाम कामगार फेडरेशन चे राज्य उपाध्यक्ष सुनील पाटील हे उपस्थित होते तसेच या कार्यक्रमाचे आयोजन मोखाडा तालुका अध्यक्ष ऋषिकेश नडगे,सचिव अनिल कोरडे,उपाध्यक्ष गिरजा भोये,सहसचिव प्रदीप तुंगार व आयटक पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

# मृत तरुणाच्या कुटुंबाला पालिकेची आर्थिक सहाय्यता

प्रतिनिधी
■ विरार

वसई -विरार शहर महानगरपालिकेच्या टोटाले तलावात गणपती विसर्जन करण्यासाठी स्वयंसेवकांची नियुक्ती करण्यात आली होती. दहा दिवसांच्या गणपती विसर्जन दरम्यान एका तरुणाचा फिट आल्याने पाण्यात बुडून दुर्दैवी मृत्यू झाला होता. या घटनेनंतर आमदार क्षितीज ठाकूर यांनी पालिकेच्या आयुक्तांकडे मृत कुटुंबाला आर्थिक मदत देण्यात यावी अशी मागणी केली होती. या मागणीला पालिकेने मान्यता देत मृत तरुणाच्या कुटुंबाला पाच लाखांची आर्थिक मदत आमदार क्षितीज ठाकूर यांच्या हस्ते देण्यात आली आहे.

वसई -विरार शहर महानगरपालिकेने प्रभाग समिती 'सी' चंदनसार अंतर्गत विरार पूर्व येथे कृत्रिम तलावाबरोबरच टोटाळे तलाव या नैसर्गिक तलावावरही गणेशमूर्ती विसर्जनाची सोय केली होती. या तलावात विसर्जनासाठी महानगरपालिकेमार्फत परिसरातील



पोहता येत असलेल्या स्वयंसेवकांची नियुक्ती करण्यात आली होती. १८ सप्टेंबर २०२४ रोजी पहाटे ३.३० वाजता या स्वयंसेवक मुलांपैकी अमित सतिश मोहिते (वय २४ वर्षे) हा विसर्जन करतेवेळी फिट आल्याने पाण्यात बुडाल्याचे निदर्शनास आले. तेथे उपस्थित महानगरपालिकेच्या अग्निशमन दलाच्या जवानांनी त्याला तात्काळ बाहेर काढून जवळच्या रुग्णालयात दाखल केले. परंतु तोपर्यंत त्याचा मृत्यू झाला होता.

या घटनेची दखल घेत आमदार क्षितीज ठाकूर यांनी दुदैवी मृत्यू झालेल्या युवकाच्या कुटुंबियांना महानगरपालिकेकडून आर्थिक मदत मिळण्याबाबत आयुक्त अनिलकुमार पवार यांना पत्राद्वारे कळविले होते. त्यानंतर पालिकेने ५ लाखांची आर्थिक मदत मृत युवकाच्या कुटुंबियांना आमदार क्षितीज ठाकूर यांच्या हस्ते दिली आहे. यावेळी आमदार हितेंद्र ठाकूर, माजी महापौर नारायण मानकर, माजी महापौर प्रवीण शेट्टी, पालिकेचे उप-आयुक्त सदानंद पुरव, सहा.आयुक्त विक्टर डिसोजा, मुख्य अग्निशमन अधिकारी दिलीप पालव उपस्थित होते.

### वाहतूक पोलिसाला शिवीगाळ, आरोपीला अटक

**मुंबई :** मरीन लाईन्स येथे नाकाबंदी दरम्यान दुचाकीस्वाराला थांबवल्याच्या रागातून वाहतूक पोलिसाला शिवीगाळ करणाऱ्या ३० वर्षीय तरुणाला आझाद मैदान पोलिसांनी अटक केली. सरकारी कामात अडथळा निर्माण केल्याप्रकरणी आझाद मैदान पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस हवालदार उमेश उगलमुगले शुक्रवारी मरीन लाईन्स येथील आयकर भवन येथे नाकाबंदीसाठी तैनात होते. त्यावेळी तेथे डेन्झिल जॉनी पांगे (३०) दुचाकीवरून आला. उगलमुगले यांनी दुचाकी थांबविण्यास सांगितल्याने डेंन्झिल संतापला. डेन्झिलने त्यांना शिवीगाळ केली.

### उन्हाच्या झळा वाढणार...

**मुंबई :** सकाळपासूनच वाढणारा असह्य उकाडा आणि सकाळी ११ पासून सायंकाळपर्यंत होणारी लाहीलाही असा अनुभव सध्या मुंबईकरांना येत आहे. उकाड्यातून सुटका होणे दूरच, उलट तो वाढण्याचा अंदाज मुंबई प्रादेशिक हवामान विभागाने व्यक्त केला आहे. मुंबईत पुढील तीन – चार दिवस कमाल तापमान ३३ ते ३६ अंश सेल्सिअसदरम्यान राहण्याची शक्यता आहे. मुंबई शहर तसेच उपनगरांत गेल्या आठवड्यात मुसळधार कोसळला. त्यानंतर मात्र पावसाने ओढ दिली. गेल्या काही दिवसांपासून मुंबईत तापमान वाढायला सुरुवात झाली आहे. वातावरणाच्या उष्णतामानात वाढ होत आहे. यामुळे असह्य उकाडा सहन करावा लागत असून, वाढत्या आर्द्रतेमुळे त्यात भर पडत आहे.

### माजी नगरसेवक अनिल पाटणकरांच्या प्रयत्नातून रस्ता कॉंक्रीटीकरण कामाचे भूमिपूजन संपन्न

**मुंबई:** माजी बेस्ट समिती अध्यक्ष, माजी नगरसेवक अनिल पाटणकर यांच्या प्रयत्नाने व बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्या वतीने घाटला म्युनिसिपल शाळा ते मैत्री पार्क एस. टी स्टॅन्ड पर्यंत रस्ता कॉंक्रीटीकरण कामाचे भूमिपूजन करण्यात आले. या कामाचे भूमिपूजन शिवसेना उपनेते सुबोध आचार्य, आमदार प्रकाश फातर्फेकर, भाजप नेते जगदीश पराडकर, फोकस फेडरेशन चेअरमन प्रसादसेन गुप्ता, महिला चेंबूर विधानसभा सहसंघटक सौ अनिता महाडिक, महिला उपविभाग संघटिका सुलभा पात्याने, चेंबूर नागरिक सहकारी बँक संचालक मिनाक्षी अनिल पाटणकर, ज्येष्ठ शिवसैनिक शशिकांत घाग, शाखाप्रमुख उमेश करकेरा, महिला शाखा संघटीका योगिता म्हात्रे, महिला शाखा समन्वयक सौ कुंदा भोईटे, युवासेना चेंबूर विधानसभा समन्वयक गणेश गायकवाड, युवासेना शाखा अधिकारी विनय शेट्ये, डि. जि. शाखा समन्वयक अनिल पटेल, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे शाखा क्रमांक १५३ महिला, पुरुष पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.



# उत्तर भारतीय जनसंवाद कार्यक्रमात संजय निरुपम यांचा उद्धव ठाकरेंवर प्रहार



प्रतिनिधी
■ मुंबई

शिंदे शिवसेनेच्या उत्तर भारतीय संघटनेच्या मुंबई प्रमुखपदी जयप्रकाश सिंह यांची नियुक्ती झाल्यानिमित्ताने सिंह यांनी कलिना विधानसभेतील वाकोला मस्जिद नेहरू रोड येथे भव्य उत्तर भारतीय जनसंवाद कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

या कार्यक्रमातील प्रमुख पाहुणे माजी खासदार व शिवसेना शिंदे गटाचे राष्ट्रीय प्रवक्ते, माजी खासदार संजय निरुपम म्हणाले की, एकनाथ शिंदे यांनी महाराष्ट्रातील खिचडी सरकार उखडून हिंदुत्वाचे सरकार स्थापन केले हा मर्यादा पुरुषोत्तम प्रभू श्री राम यांचा मोठा आशीर्वाद आहे. हिंदुत्वाची विचारधारा विसरून सोनिया गांधी आणि राहुल गांधी यांच्या दरबारात डोके टेकवणारे उद्धव शिवसेना फक्त भिंडी बाजार आणि भिवंडीपुरती मर्यादित आहे. महाराष्ट्रात हिंदुत्वाची विचारधारा घेऊन जाणाऱ्या एकनाथ शिंदे यांच्यावर मर्यादा पुरुषोत्तम रामांचा आशीर्वाद होता म्हणून हिंदुत्वाचे रक्षण करणाऱ्या सरकारमध्ये सहभागी होऊन महाराष्ट्र वाचवला.

या कार्यक्रमाचे आयोजक जयप्रकाश सिंह यांनी यशस्वी उत्तर भारतीय जाहीर सभा घेतल्याबद्दल त्यांचे अभिनंदन करून शिवसेना शिंदे गटाच्या उत्तर भारतीय संघटनेच्या मुंबई प्रमुखपदाची जबाबदारी मिळाल्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले. यावेळी विशेष आशीर्वाद देण्यासाठी श्री श्री 1008 बाबा ओमदास महाराज यांच्यासह विभागप्रमुख आमदार मंगेश कुडाळकर, माजी आमदार कृष्णा हेगडे, कालिना प्रभारी कमलेश राय, ॲड जगताप, कार्यक्रमाचे समन्वयक विधानसभा प्रमुख दशरथ सकपाळ, शाखाप्रमुख संजय तिलोरे, महिला शाखा प्रमुख स्नेहा कुरतडकर,राजेश सिंह , दिनेश सिंह , श्रीप्रकाश सिंह , शैलेश राय, तौफिक शेख, कांचन गुप्ता, अंजली पांडे, किरण बाबा चौरसिया यांच्यासह शिंदे शिवसेना पदाधिकारी व कालिना येथील रहिवासी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**वसई विरार शहर महानगरपालिका**
**प्रभाग समिती (बी) विरार पूर्व**
**मुख्य कार्यालय - विरार**
दुरध्वनी - ९५२५०-२४०२१७९ / २४०३४४२ / २४०२५६३

जावक क्र.: वविशम / कवि / १०१६ / २०२४-२५ — दिनांक : ०४/१०/२०२४

महाराष्ट्र मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४६९ अन्वये जाहीर नोटीस खालील मालमत्तेच्या हस्तांतरण संबंधाने वसई विरार शहर महानगपालिका प्रभाग समिती बी कार्यालय नालासोपारा येहते प्राप्त झालेल्या मालमत्ताधारकाच्या प्रकरण परत्वे नोटिसीनुसार सदर हस्तांतरण संदर्भाने कोणत्याही हितसंबंधाने हरकत अगर आक्षेप असल्यास हि नोटीस प्रसिद्धझाल्यापासून ७ दिवसांच्या आत हितसंबंधाच्या व हरकतीच्या लेखी पुराव्यासह वसई विरार शहर महानगपालिका प्रभाग समिती बी कार्यालय नालासोपारा येथे लेखी स्वरूपात हरकत नोंदवावी अन्यथा कर वसुलीच्या सोयीसाठी सदर हस्तांतरण करून महानगरपालिका दप्तरी या बाबतची नोंद घेतली जाईल.

| अ. क्र. | विभाग | मालमत्ता क्र. | पावती क्र. | ज्याचे नावे मालमत्ता आहे त्याचे म्हणजे मालमत्ता विकणाऱ्याचे नाव किंवा कर दात्याचे नाव | खरीददाराचे किंवा अभिहस्तांकन कर दात्याचे नाव |
|---|---|---|---|---|---|
| 1 | तुळींज-2 | NL02/325/20 | 3156 | मालाराम चौधरी . | दिलीप कुमार गौंड |
| 2 | तुळींज-2 | NL02/622/99 | 3158 | मनोहर पांडुरंग गावनंग | ऋषिकेश विजय डांगरे |
| 3 | तुळींज-2 | NL02/703/20 | 3162 | काडिवाल रजा हुसैन नूर मोहम्मद | गोलम रब्बानी मोहम्मद जाहोगिर |
| 4 | तुळींज-2 | NL02/933/23 | 3187 | गुरविंदर पाल सिंग | कविता शांताराम जाधव |
| 5 | तुळींज-2 | NL02/987/30 | 3197 | सुजाता शाहजी थोरात | सुरेखा सुरेश पोंगडे |
| 6 | तुळींज-2 | NL02/20/117 | 3199 | उषा राजन धानकुटकर | दिनेश तुकाराम देवघरे |
| 7 | तुळींज-2 | NL02/676/105 | 3203 | शंकर पवार | निवृत्ती यशवंत घेवडे |
| 8 | तुळींज-2 | NL02/676/199 | 3207 | सुहास धुरी | शैलेंद्र अवधेश सिंब व छाया शैलेंद्र सिंग |
| 9 | तुळींज-2 | NL02/195 | 3209 | निर्मला भगवान पखाले | आनंद भगवान पखाले |
| 10 | तुळींज-2 | NL02/497/11 | 3211 | मोमो / सय्यद अब्दुल रशिद . रशिद / नईम मो / रफिक | सईद मोहम्मद मोहम्मद रशीद |
| 11 | तुळींज-2 | NL02/707/119 | 3213 | महेश एसचंदिरामनी . | निजामुदीन जियाउध्दीन खान |
| 12 | तुळींज-2 | NL02/398/79 | 3215 | अब्दुल सलीम शेख | मोहम्मद मंसूर जयरुद्दिन मिया |
| 13 | तुळींज-2 | NL02/264/1 | 3217 | अनिलकुमार हु,व प्रमोदकुमार हु, व विनोदकुमार हु,धोबी निर्मळ | बाळूराम खेमराज कुमावत |
| 14 | तुळींज-2 | NL02/688/51 | 3219 | विजयमाला आनंद सुतार | अनिता चंद्रशेखर पटेल |
| 15 | तुळींज-2 | NL02/1023/29 | 3221 | हरिचंद्र जनार्दन सुर्वे | गुरुदास रामचंद्र थोरात |
| 16 | तुळींज-2 | NL02/322/11 | 3223 | मगुले पाल | सीताराम पाल व सत्यनारायण पाल व शिव आसरे पाल व राम आसरे पाल |
| 17 | तुळींज-2 | NL02/1250/7 | 3224 | शिवशंकर अनमोल सिंह | लता बजाधव. |
| 18 | तुळींज-2 | NL02/929/17 | 3237 | राबिया साजिद अन्सारी | मोहम्मद साजिद गय्यूर अन्सारी |
| 19 | तुळींज-2 | NL02/402/6 | 3242 | कोनार्क कोम्प्लेक्स | रमेशचंद बालकिसुन गौंड |
| 20 | तुळींज-2 | NL02/497/10 | 3244 | फकरुद्दीन खान | मोहम्मद इम्तियाज खलील शेख |

सही /-
सहा. आयुक्त
प्रभाग समिती (बी) विरार पूर्व
वसई विरार शहर महानगरपालिका

Printed and Published by **Bhushan B.Mhatre** for Owner **Marik Media And Communication Pvt .Ltd.** at S.R.Publicatiinns ,Mohan Arjun Compound ,Godown No. 8,9 And 10 , Near Ghartan Pada ,Vaishali Nagar ,Last Bus Stop ,Dahisar (E ) ,Mumbai -400068 and Published From Marik Media And Communication Pvt .Ltd.,102, Shyam Sunder Sadan ,Sitaram Jadhav Marg, Lower Parel ,Mumbai 400013. Editor - **Deepak B. Mhatre**, E-mail vruttmanas1@ gmail.com ,telephone 2498546,24985609. Resident Editor - **Sham Deulkar**

**As per PRB Act Editorial Responsibilities On Deepak B. Mhatre Nespaper Related Desputes Lies Under Jurisdiction of Mumbai Courts**

**Year - Twenty Nine**
**Issu - 106**
**R.N.I. Registration No. - 65609/96**

मुद्रक आणि प्रकाशक **भूषण भा. म्हात्रे** यांनी मालक **मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.** साठी, एस. आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंपाऊंड, गोडाऊन नं. ८,९ आणि १०, घारटन पाडावळ, वैशालीनगर लास्ट बस स्टॉप, दहिसर (पूर्व), मुंबई - ४०० ०६८ येथे छापून मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि., १०२, श्याम सुंदर सदन, सीताराम जाधव मार्ग, लोअर परळ (पश्चिम), मुंबई - ४०० ०१३ येथून प्रकाशित केले. संपादक - **दीपक भा. म्हात्रे,** E-mail: vrittamanas1@gmail.com दूरध्वनी क्रमांक - २४९८५४६, २४९८५६०९ निवासी संपादक - **शाम देऊलकर**

**पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी दीपक भा. म्हात्रे यांच्यावर राहील. सदर वृत्तपत्रासंबंधीच्या विवादित बाबी मुंबई न्यायालय क्षेत्रात येतील.**

**वर्ष- एकोणतीसावे**
**अंक - १०६**
**आर.एन.आय. रजिस्ट्रेशन क्र.- ६५६०९/९६**

बंदुकांच्या टोकदार, धारदार संगिनींचं सिंहासन बनवता येतं... पण, त्यावर फार काळ बसता येत नाही!



- बोरिस येल्त्सिन
रशियाचे पहिले राष्ट्राध्यक्ष

वृत्तमानस
मुंबई, रविवार, ६ ऑक्टोबर २०२४




**०७-०९-२०२४ ते १३-१०-२०२४ (रविवार ते शनिवार)**

**मेष - हळुवार व्यवहार मार्गी लागतील.**
ग्रहसंकेतपहाता सप्ताहाचा उत्तरार्ध चांगला जाऊ शकेल. नियोजित कामे करतांना यशाचे प्रमान वाढते राहील.हा सर्व दिवसांचा कालावधी जेमतेम बरा राहु शकेल.काहि ही करताना भान ठेवावे लागेल.नुकसानही या कालावधीत होऊ शकते.सतर्क राहून कामकरने बरे.तसा दिवसांचा कालावधी बराअसेल.१०चा तूळेतला बुधबदल पोषक राहील.१२चा वृश्चिकेतला शुक्रबदल आहार नियंत्रण सुचवतोय. व्यवहार मार्गी लागु शकतील.कौटुंबिकस्तरावर वावरतांना गोड बोलत सामोरे जाणे अधिक पोषक ठरु शकेल.व्यवसाय अनेक मार्गांतून आलेले प्रस्ताव चांगले असतील.नोकरदार कामाबाबतीत जबाबदारी पार पाडाल.
**महिला -** आर्थिकदृष्ट्या बचत करणे योग्य राहु शकेल. समाजसेवेची आवड राहील.संततीसौख्य लाभेल.नातेवाईकांशी कार्यक्रमानिमित्त भेटीगाठी होऊ शकतील.
**विद्यार्थी -** प्रकृती ठीकठाक असेल.
**शुभदिनांक-१०-११-१२.**

**वृषभ - मनोकामना अपूर्ण राहील.**
ग्रहसंकेत पहाता प्रतिकुल सप्ताह जाऊ शकेल. नियोजित कामे करतांना नाहक ओढातान होऊ शकेल.ग्रहांची साथ तितकिसी नसेल. सध्या कोणत्याही कामाला उशीर हा ठरलेलाच असेल.कामे वेळेत पूर्ण होनार नाहीत,नाहक चिड चिडिचा सामना करावा लागेल.कोणतेही काम करायला गेलात तर आळसामुळे कठीन असेल.कामातील उत्साह कमी राहील.मदत मिळेलच असे नाही.करावी लागणारी धावपळ कदाचित वाढेल.शांतपणाने निर्णय घेत चला.बुधबदल वाद टाळावयास सांगतोय.शुक्रबदल मात्र बर्यापैकी पोषक ठरुशकेल.व्यवसायात प्रगतीचे प्रमान कमी होऊ शकेल. नोकरदार कामासज्यादा वेळ काढावा लागेल.
**महिला -** आर्थिक नियोजन मार्गी लावावे लागेल. संततीचे लाड जपुन करावेत. शिस्त बिघडू देऊ नका.घरगुती वाता वरण बरे राहील. मानसिक समाधान शोधावे लागेल.
**विद्यार्थी -** आरोग्य नरम राहील.
**शुभदिनांक-११-१२-१३.**

**मिथुन - यशात वाढ संभवते आहे.**
गिरहसंकेतपहाता सप्ताहाचा पूर्वार्धचांगला जाऊ शकेल. नियोजित कामे करतांना उत्साह वाढता राहु शकेल.शुभ ग्रहांची साथ बर्यापैकी आहे. बऱ्याच दिवसांपासून वाट प हात होता अशा गोष्टींचे चांगले संकेत संकेत मिळत आहे त.सध्याचे दिवस बरेआहेत असे म्हणायला हरकत नाही. सप्ताहात संधी सोडायची नाही हे लक्षात ठेवावे.आलेल्या प्रस्तावाचा विचार केलेला बरा रागील.यशासाठी फार वेळ लागणार नाही.वेळेत कामे पूर्ण होऊ शकतील.बुधबदल पोषक राहील.शुक्रबदल वाद टाळण्यास सुचवतोय. व्यवसायिकदृष्ट्या विशेष धावपळ होणार नाही.नोकरदार वर्गाला कामाच्या बाबतीत होणारा त्रास दूर होईल. **महिला -** आर्थिक बाबतीत समाधानाची परिस्थिती असु शकेल.महत्त्वाच्या गोष्टींवर चर्चा होऊ शकेल.धार्मिक गोष्टींत उत्साहअसला तरी करण्यासाठी वेळ नसनार.
**विद्यार्थी -** आरोग्य बरे असेल.
**शुभदिनांक-७-८-९.**

**कर्क - लाभात वाढ होईल.**
ग्रहसंकेत पहाता संपूर्ण सप्ताह अनुकुल जाऊ शकेल.नियोजित कामे कतांना समीकरण जुळून येऊ शकतील.या सर्व दिवसांचा कालावधी अतिशय उत्तम राहु शकेल.या कालावधीत जे काही करणार आहात त्या गोष्टीला नक्की चांगले यशमिळु शकेल.एका दगडात दोनपक्षी मारणे साध्य होणार आहे. हीसंधी बऱ्याच दिवसांतून आलेली आहे कौटुंबिकस्तरावर वावरतांना मनसोक्त आनंदाला उत्तम चालना मिळु शकेल.सामाजिक प्रतिष्ठेत वाढहोऊ शकेल. बुधबदल हळवेपना देईल.शुक्रबदल आनंदी करु शकेल. व्यवसायातील डावपेच अचूकतेने यशस्वी होऊ शकतील. नोकरदार काम नेहमीप्रमाने सुरळीत चालू राहु शकेल.
**महिला -** आर्थिकदृष्ट्या बचत करण्याचा प्रयत्न सफल होईल. कौटुंबिक वैवाहीकजीवन सुखाचे राहु शकेल.पतीचे सहकार्य लाभु शकेल.मानसिक समाधान लाभु शकेल.
**विद्यार्थी -** प्रकृती उत्तम साथ देईल.
**शुभदिनांक-८-९-१०.**

**सिंह - व्यवहार सांभाळुन करावेत.**
ग्रहबळ पहाता उत्तरार्ध सप्ताहाचा चांगला जाऊ शकेल. नियोजित कामे करतांना दुर्लक्ष होऊ देऊ नये.या दिवसांच्या कालावधीत कोणतीही घाई करून निर्णय घ्यायचे नाहीत हे लक्षात ठेवावे लागेल.अन्यथानुकसान होऊ शकते. अनोळख्या व्यक्तीवर अजिबात विश्वास ठेवू नका.कौटुंबिकस्तरावर वादविवादापासून जरा लांबच राहाणे बरे.आपले तेच खरे करूनका.ऐकून घेण्याची मानसिकता नसली तरी ती मानसिकता वेळेवरच करून घ्यावी लागेल.बुधबदल पराक्रमास बराअसेल.शुक्रबदल भावनात्मक असेल. व्यवसायात फार मोठी गुंतवणूक करू नका.नोकरदार वर्गाला कामात बदल करावे लागतील.उपासना सोडु नका.
**महिला -** आर्थिक बाबतीत व्यवहार चोख ठेवावेत.मित्र-मैत्रिणींचे सहकार्य मिळवावे लागेल.कुटुंबाची काळजी घ्या. जोडीदाराचा आदर करावा लागेल.मनमानी करु नका.
**विद्यार्थी -** प्रकृती स्वास्थ्य जपलेले बरे.
**शुभदिनांक-१०-११-१२.**

**कन्या - संयम महत्वाचा असेल.**
ग्रहबळ पहाता प्रतिकुल सप्ताह जाऊ शकेल.नियोजित कामे कपतांना उगाचच चिडचिड करुन नुकसान ओढवुन घेऊनका.कौटुंबिकस्तरावर वावरतांना मतभेद ताणू नका. कालावधी फारसा अनुकूल नाही. घाईगडबडीने कोणतीही गोष्ट करायला जाऊ नका.कोनी काय करावे काय करू न ये याचा सल्ला देत बसू नका.हा सल्ला अंगलट येऊ शकतो. एखादी गोष्ट तुम्ही प्रत्यक्षात पाहात नाही तोपर्यंत त्या गोष्टीवर प्रतिक्रिया देऊ नका.खरेदी करताना भान ठेवावे. बुधबदल अडचनी वाढवु शकतो.शुक्रबदल बराराहु शकेल. व्यवसाय खरेदी-विक्रीचे व्यवहार करतानामागीलअनुभव विसरू नका.नौकरदार आहेत्यात समाधान मानावे.
**महिला -** आर्थिकदृष्ट्या व्यवहार जपून करावेत.कौटुंबिक मतभेद उगाचच आणू नका.जोडीदाराच्या सल्ल्याने पुढे जाणे पोषक राहील, मानसिक ताण तणाव घेऊ नका.
**विद्यार्थी -** प्रकृतीची काळजी घ्यावी.
**शुभदिनांक-११-१२-१३.**

**तूळ - संबंध सुधारु शकतील.**
ग्रहबळ पहाता पूर्वार्ध सप्ताहाचा चांगला जाऊ शकेल.नियोजितकामे करतांना यशात वाढ होऊशकेल.या कालावधीत कदाचित द्विधावस्था निर्माण होऊ शकते,कोणतेही निर्णय घाईने घेऊ नये.त्यापेक्षा याकालावधीत निर्णय टाळलेले चांगले राहील.तरिसुध्दा हे सर्व दिवस उत्तमअसु शकतील. विचारकरुन निर्णय घेतल्यास यशस्वी होतील.
अनेक दिवस रखडलेली कामे पूर्ण होऊ शकतील.कौटुंबिकस्तरावर वावरतांना चांगला प्रतिसाद मिळु शकेल. बुधबदल चांगला राहील. शुक्रबदल प्रतिष्ठा वाढवु शकेल. व्यवसायात फायद्याचे प्रमाण बर्यापैकी चांगले राहील.नोकरदार वर्गाला वरिष्ठांकडून कौतुकाची थाप मिळु शकेल.
**महिला -** आर्थिक प्रश्नचांगले सुटु शकतील.राजकीय क्षेत्रात यश मिळु शकेल.जेवढ्यास तेवढे राहावे.नातेवाईकांशी संवाद साधावा लागेल. नातेसंबंध सुधारु शकतील.
**विद्यार्थी -** आरोग्य ठीक राहील.
**शुभदिनांक-७-८-९.**

**वृश्चिक - सर्वस्तरावरआघाडी मिळेल.**
ग्रहबळ पहाता संपूर्ण सप्ताह लाभदायक जाऊ शकेल.नियोजित कामे करतांना भरीव सफलता मिळवु शकाल.या सर्व दिवसांचा कालावधी शुभदायक राहु शकेल.काही वेळेला आपण जरी ठरवले की समोरच्याशी जेवढ्यास तेवढे राहायचे.नेमके चांगल्या कालावधीत ही समोरची लोकखूप आदराने वागतात.बघण्याचा दृष्टिकोन बदलेल.भाव
नेच्या आहारी जाऊन सर्व काही बोलून रिकामे होतात.चांगल्या दिवसात चांगलीच आघाडी मिळवु शकाल.बुधबदल गुंतवनुकीस चांगलाअसेल. शुक्रबदल आनंद वाढवील. व्यवसायात नफ्याचे प्रमाण भरपूर चांगले राहु शकेल.नोकरदार वर्गाचे कामातील नियोजन यशस्वी होऊ शकेल.
**महिला -** आर्थिक लाभअपेक्षेप्रमाने होतील.रखडलेली कामे यशस्वीपने मार्गी लावु शकाल.कौटुंबिकस्तरावर वावरतांना सौख्य व समाधानात अविस्मरणीय वाढ संभवते.
**विद्यार्थी -** आरोग्य उत्तम राहील.
**शुभदिनांक-८-९-१०.**

**धनू - निरर्थक वाद टाळावेत.**
ग्रहप्रभावपहाता सप्ताहाचा उत्तरार्ध चांगला जाऊ शकेल. नियोजित कामे करतांना आत्मविश्वास उपयोगी पडु शकेल.यादिवसांच्या कालावधीत धरलं तर चावतंय-सोडलं तर पळतंय अशी अवस्था होऊ शकेल.काय करावे काय करू नयेहे कळणार नाही.निर्णय घेतला तरी त्रास होणार नाही हे पहावे.मागील अनुभव न विसरता निर्णय घेतल्यास काहीही चुकीचे होणार नाही.कोणतेही कामअसू द्या समाधान मिळेल,त्यासाठी उशीर लागणार आहे.तेव्हा दडपण घेऊ नका.बुधबदल पोषक.शुक्रबदल गुंतवनुकीस बरा.व्यवसायात कदाचित  अनपेक्षित लाभ होऊ शकतील. नोकरदार वर्गाचा कामातील व्याप बर्यापैकी वाढु शकेल.
**महिला -** उधारीचे व्यवहार टाळावेत.घरगुती वातावरण चांगले कसे राहील ते पाहावे लागेल.निरर्थक चर्चासत्र करत बसुन अडचनिंना आमंत्रण देऊ नये.कटाक्षाने टाळावे.
**विद्यार्थी -** आरोग्याची काळजी घ्यावी.
**शुभदिनांक-१०-११-१२.**

**मकर - रागावर संयम ठेवायलाच हवा.**
ग्रहप्रभाव पहाता प्रतिकुल सप्ताह जाऊ शकेल.नियोजित कामे कतांना मनमानी करु नये.सर्वच दिवस काळजीपूर्वक हाताळावे लागतील.अवलंबून कोणतीही गोष्टसाध्य होणार नाही.कौटुंबिकस्तरावर वावरतांना तर्कशुद्ध पद्धतीने विचार करुन योग्य निर्णय घ्यावेत.प्रत्येक गोष्टीत एक घाव दोन तुकडे करून चालणार नाही.सध्या आपली डाळ शिजणार नाही.ज्या गोष्टीतून चांगले काही होणार आहे.अशाच गोष्टींना प्राधान्यद्यावे.नकारात्मक विचार टाकावे.बुधबदल बरा राहील.शुक्रबदल बर्यापैकी पोषक राहील. व्यवसायात चाललेल्या घडामोडीत जबाबदारीने पाऊल टाकावे लागेल. नोकरदार वर्गाने शांत राहून काम करावे.
**महिला -** आर्थिकबाबतीत उगाचच धाडसी निर्णय घेऊ नका नातेवाईकांशी जेवढ्यास तेवढे राहावे लागेल.महत्वाच्या निर्णयात जोडीदाराची साथ मिळवावी लागेल.
**विद्यार्थी -** योग साधनेला महत्त्व द्यावे.
**शुभदिनांक-११-१२-१३.**

**कुंभ - समजदारी उपयोगी पडेल.**
ग्रहप्रभाव पहाता सप्ताहाचा पूर्वार्ध चांगला जाऊ शकेल. नियोजित कामेकरतांना मिळतेजुळते घ्यावेलागेल.या कालावधीत जपून पाऊल टाकावे लागेल.हे दिवसअधिक चांगले घालवता येतील प्रयत्न करत चला. राग वाढेल अशा गोष्टी तुमच्यासमोर या दिवसांत येऊ शकतात.तुमचा राग वाढू देऊ नका.एखादी गोष्ट आवडत नाही आणि तीच ने
मकी समोर येणार असा प्रकार असल्यामुळे चिडचिड होऊ शकते.यशस्वी कामासाठी थोडा उशीर लागेल.बुधबलबर्यापैकी चांगला असेल.शुक्रबदल प्रतिष्ठा वाढवु शकेल.व्यवसाय अविचाराने नको ते धाडस करू नका. नोकरदार वर्गाने आपले काम एके काम हे सूत्र लक्षात ठेवावे.
**महिला -** आर्थिक व्यवहार जपून करावेत.समाजमाध्य
मांपासून लांब राहावे लागेल.मनोरंजनात आनंद मिळेल.
**विद्यार्थी -** आरोग्य बरे राहील.
**शुभदिनांक-७-८-९.**

**मीन - यशस्वी आठवडा असेल.**
ग्रहप्रभाव पहाता संपूर्ण सप्ताह चांगला जाऊ शकेल.नियोजित कामे करतांना जबाबदारी वागावेच लागेल.कौटुंबिकस्तरावर आनंदात चांगली वाढ होऊ शकेल.या सर्व दिवसांत येणारेप्रस्ताव यशस्वी असतील.तरिसुध्दा जे काही करायचे आहे ते शांत डोक्याने करायचे आहे.लाभात चांगली वाढहोऊ शकेल.शिवाय ज्या गोष्टीची तुम्हाला कल्पना नाहीअशागोष्टीवर उगाचचर्चा करत बसु नका.किंवा कोणाला सल्ला देत बसू नका.सामाजिकस्तरावर प्रतिष्ठा वाढवु शकाल.बुधबदल बरा.शुक्रबदल लाभ वाढवील.व्यावसायिक यशस्वी बदल करावे लागु शकतील.नोकरदार वर्गाला नवीन यशस्वी कामाचा अंदाज येऊ शकेल.
**महिला -** मनमोकळेपणाने बोलल्यामुळे हलके वाटु शकेल. कौटुंबिकस्तरावर वावरतांना संततीचे सौख्य लाभु श केल.घरगुतीस्तरावर वातावरण आनंदी राहु शकेल.
**विद्यार्थी -** तब्येत ठणठणीत राहील .
**शुभदिनांक-८-९-१०.**

# बैलपुत्रांची राज्यमाता...

**प्रविण पुरो**



**निवडणुका** आल्या की लोकांच्या भावनेला हात घालायचा हा उद्योग आजचा नाही. लोकांच्या मनावर राज्य करण्यासाठी बेकामी नेत्यांना असे निर्णय हे घ्यावेच लागतात. मात्र अशा निर्णयांची स्वत:ला शुचिर्भूत मानणारे री ओढतात तेव्हा त्याची चिंता अधिक वाटते. मुख्यमंत्र्यांच्या लाडक्या बहिणींसाठी सुरू झालेली 1500 रुपये जमा करण्याची योजना असो वा 60 वर्षांवरील ज्येष्ठाला तीर्थक्षेत्राचं दर्शन असो. जे काम एखाद्या संस्थेने करायचं ते सरकार करू लागल्याने शासन म्हणून गाडा चालायचा कसा, असा साधा प्रश्न आहे. बहिणींना काहीही न करता 1500 रुपये देण्याच्या निर्णयाने राज्याच्या तिजोरीवर सुमारे 35 हजार कोटींचं ओझं निर्माण होऊनही सरकारला आपण काही गैर करतो, असं वाटत नसेल तर राज्याचं दुर्दैवच म्हटलं पाहिजे. तिजोरीत ठणठणाट असताना असे निर्णय घेणं खरं तर कोषात पाणी ओतण्यासारखंच होय. ती कसर भरून काढण्यासाठी आता घरगुती गॅसची किंमत वाढवा, मुद्रांक शुल्क 100 वरून 500 रुपयांनी वाढवा असले उद्योग सामान्यांच्या बोकांडी बसतात तेव्हा चिंता अधिक वाढते. बुडती नाव वाचवण्याची सरकारची ही कला अफलातूनच म्हटली पाहिजे. या फुकट्या योजनांसाठी पैसा आणायचा कुठून, हा उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा सवाल बोलका आहे. पण सत्तेपुढे ते लाचार आहेत. यामुळे लोकांचे खिसे ओरबाडण्याचा नवा उद्योग त्यांनी सुरू केला आहे.

एक संकट बोकांडी असताना आता गायींच्या रक्षाची जबाबदारी सरकारने आपल्याकडे घेतली आहे. देशी गायींना राजमाता म्हणून दर्जा देण्याचा निर्णय घेत सरकारने स्वत:ची पाठ थोपटून घेतली आहे. हा निर्णय या सरकारने भावनेच्या आधारे घेतला असला तरी त्याचे होणारे विपरीत परिणाम राज्यातल्या शेतकऱ्यांना परवडणारे नाहीत. स्वत: कसं जगायचं या विवंचनेत सापडलेल्या शेतकऱ्याला आपली गाय जगवायची कशी या संकटात टाटलं आहे. मग तिने उभी शेती फस्त केली तरी चालेल. वाढत्या महागाईत शेतकऱ्याला जगणं असाह्य झालं असताना गायींना जगवण्याचं दुहेरी संकट शेतकऱ्यावर ओढवलं आहे. दूथ देईपर्यंत गाईचं महत्व अधोरेखित आहे. पण ती दूध देईनाशी झाल्यावर तिचं कारायचं काय, असा प्रश्न प्रत्येक शेतकऱ्याला आहे. ज्याचं उत्तर त्याच्याकडे नाही. गायीला मरेपर्यंत जोपासण्याचे उद्योग सरकारने शेतकऱ्यांच्या मागे लावले आहेत. भाकड बनलेल्या गायी आता मंत्र्यांच्या बंगल्यापुढे बांधाव्यात काय, असा सवाल शेतकरी विचारत आहेत. गायीच्या दुधाची मानवी आहारातील गरज, मानवी शरीर पोषणासाठी गायीच्या दुधाचं महत्व, सेंद्रीय खतांसाठी गायीच्या मलमुत्राचा वापर असली कारणं पुढे करत पशूसंवर्धन आणि दुग्धविकास मंत्री राधाकृष्ण विखेपाटील यांनी गायीला राजमातेच्या दर्जा देण्याची टूम काढली.

गायीच्या नावावर देशभर राजकारण करणाऱ्या भाजप आणि सनातनी हिंदूंनी देशात अराजक परिस्थिती निर्माण केल्याची असंख्य उदाहरणं आहेत. नोएडामध्ये अखलाख नावाच्या व्यक्तीला जिवे मारणाऱ्या सनातनी हिंदूंना आपल्या कृत्याचं काहीच वाटलं नाही. गोमांस विकण्याचं निमित्त करत असंख्य मुस्लीम युवकांना जिवानिशी मारण्यात आल्याच्या असंख्य घटना देशात घडल्या. या घटना अत्यंत गैर होत्या असे गायी राखणारे सांगू लागले आहेत. पण जे गोमांसचा धंदा करतात त्या 15 हिंदू व्यापाऱ्यांचं काहीही वाकडं झालं नाही. नागपूरमधील शिवणगाव हे गायींच्या दुधाच्या उत्पादनावर चालणारं एक गाव. या गावातील 90 टक्के कुटुंब ही गायीच्या दूध उत्पादनावर आपली घरं चालवतात. नागपूरमधील दुधाचं गाव म्हणून या गावाचा उल्लेख होतो. मिहान प्रकल्पासाठी हे गाव पूर्णत: जमीनग्रस्त झालं. गावचं पुनर्वसन झालं पण गायींना गोठे काही मिळाले नाहीत आणि सरकारने ते दिले नाहीत. सरकार शेतकऱ्यांशी कसं दुटप्पी वागतं याचं हे एक उदाहरण. भाकड गायी हा विषय तर इतका गंभीर बनला आहे की या गायींचं करायचं काय, असा प्रश्न शेतकरी स्वत:लाच विचारतो आहे. कसायाला दिली की गुन्हा होतो आणि आपण तिला न जगवल्यास दोषाचं धनी व्हावं लागतं या विवंचनेत शेतकरी सापडला आहे. शिवणगावात 2000 हजार गायींमध्ये 800 गायी या भाकड आहेत. या गायींना जगवायचं की आपण जगायचं असं संकट तिथल्या शेतकऱ्यांवर ओढावलं आहे. पूर्वी या गायीला किमान 20 हजार रुपये मिळायचे. पण गोहत्येचा निर्णय घेतल्यापासून भाकड गायी कोणी घ्यायला पुढे येत नाही. गायी शेतकऱ्यांनी सांभाळायच्या आणि 50 रुपयांचं अनुदान गोशाळांना, हा कुठला प्रकार? अशा असंख्य गोशाळा या ठराविक गटातील व्यक्तींच्या आणि राजकारण्यांच्या नातलगांच्या असल्याने त्यांनी नव्याने सोय केली, असंच काहीसं झाल्याचं दिसतं. त्याऐवजी शेतकऱ्याच्या दुधाला योग्य भाव दिला तर त्याच पैशात तो गायीची जोपसना करू शकतो, हे तत्व सरकारला आणि सरकारच्या मंत्र्यांना कोणी कसं सांगितलं नाही? त्याऐवजी शेतकऱ्याला जगायचा मार्ग रोखला आणि गायींची धन केली, असाच हा प्रकार सरकारने केला आहे. ज्येष्ठ पत्रकार श्रृती गणपतेय यांनी गायींच्या नावाने राजकारण करणाऱ्यांवर 'गायीच्या नावाने चांगभलं' नावाचं पुस्तक लिहिलंय. राज्यमाता संबोधल्याने गायींची पैदास वाढेल, त्या अधिक दूध देतील असं काहीही होणार नाही. उलट गायींच्या नावाने राजकारण करणारे उत्तरप्रदेशप्रमाणेच महाराष्ट्रात अराजकता निर्माण करतील, ही गणपतये यांनी व्यक्त केलेली भीती अगदीच अनाठायी नाही. गोशाळेतील गायींना अनुदान देणाऱ्या सरकारने भटक्या गायींविषयी काहीही निर्णय घेतलेला नाही. यापूर्वी तालुका तालुक्यात भटक्या गायींचा बंदोबस्त करण्यासाठी कोठड्यांची व्यवस्था केली जायची. आज अशा कोठड्या मोजून सापडत नाहीत. या गायी उभी शेती फस्त करतात. देशातील शेतीच्या उत्पन्नातील 35 टक्के इतकं उत्पन्न हे भटक्या गायींमुळे वाया जात असल्याचं आकडेवारी सांगते. दुष्काळी भागात वावरणाऱ्या अशा गायी म्हणजे संकटात बारावा महिना म्हणता येईल. अशा गायी पोसायच्या म्हणजे दिवसाकाठी किमान 300 रुपयांचा खर्च अपेक्षित असताना सरकार मात्र 50 रुपयांमध्ये बोलवण करत आहे. ज्या राज्यांनी गोहत्या कायदा आणला तिथे गायींच्या संख्येत झपाट्याने घट झालेली पाहायला मिळते. जिथे हा कायदा नाही त्या प. बंगालमध्ये गायींची पैदास ही 15 टक्क्यांनी वाढल्याचं आकडेवारी सांगते. एकसारखं उत्पादन देणारी गाय आणि म्हशींना वेगळं गणलं गेलं आहे. उलट म्हशी या तितक्याच उपयुक्त असल्याचं शेतकरी सांगतात. गायीच्या कितीतरी पटीने अधिक तेही अधिक दर्जेदार दूध या म्हशी देत असतात. मात्र तिला मारा वा तिचं मास खा, तिथे कोणतंही बंधन नाही, हा सारासार विरोधाभास होय.

या सरकारमध्ये सावरकरांना मानणारे अनेक आहेत. मात्र राज्यमातेचा निर्णय घेताना यातल्या एकानेही सावरकर यांचं गायींविषयीचं मत जाणून घेतलेलं दिसत नाही. गायीला देवाचं प्रतिक मानण्याला सावरकरांचा स्पष्ट विरोध होता. ती माता नव्हे, देवता तर नव्हेच नव्हे, गाय ही उपयुक्त पशू असल्याचं सावरकर यांनी आपल्या समग्र वांड्मयाच्या पाचव्या खंडात नमूद केलं आहे. गोरक्षण आणि गोभक्षण हे ब्रम्हवादाने स्वीकारलेलं सत्य आहे. ब्रम्हसृष्टीने गाय आणि गाढव यांना एकच दर्जा दिला असल्याचं सावरकरांचं म्हणणं याच ब्रम्हसृष्टीचा पुरस्कार करणाऱ्या भाजपच्या नेत्यांनी लक्षात घ्यावं. सुबुध्द आणि दयाशील माणसाच्या डोळ्यांवर धर्माची झापड बसवली की बुध्दी भ्रष्ट होते, हे सावरकरांचं म्हणणं विद्यमान सत्ताधाऱ्यांना जसच्या तसं लागू पडतं. पोथ्या सांगतात त्याप्रमाणे वराहवतारी देव डुक्कर झाले होते. म्हणून डुक्कर रक्षण संघ स्थापून डुक्कर पूजा का करू नये, हे सावरकरांचं म्हणणं सनातन्यांनी लक्षात घ्यावं, म्हणजे आपण कुठे आहोत? आणि कसलं राजकारण करतो, हे त्यांच्या लक्षात येईल. सावरकरांच्या भाषेत या निर्णयाला 'बैलपुत्रांची राज्यमाता' म्हटली तर वावगं ठरणार नाही...

**(लेखक ज्येष्ठ पत्रकार - राजकिय विश्लेषक आहेत.)**

## पत्र मानस

### ई सुंदरी ऐवजी प्रवाशांना प्राथमिक सुविधा पुरविणे गरजेचे

महाराष्ट्र राज्याचे एस टी महामंडळाचे नूतन अध्यक्ष श्री गोगावले यांनी महामंडळाच्या बैठकीत मुंबई पुणे प्रवासात ई सुंदरी राहणार असल्याचे सूचित केले .विमानात हवाई सुंदरी असते . पण एस टी मध्ये शिवनेरी मध्ये आता त्या धर्तीवर ई सुंदरी राहणार आहे . वास्तविक सध्या एस टी समोर अनेक प्रश्न आहेत . एस टी कर्मचाऱ्यांचा अनेक मागण्या आहेत . शिवाय बस स्थानके तेथील व्यवस्था या बाबत सुद्धा लक्ष देण्याची गरज आहे . अनेक बस स्थानकात खड्ड्यांचे साम्राज्य आहे . अस्वच्छता आहे . कित्येक ठिकाणी टॉयलेट आहेत पण तेथे पाहण्याची सुद्धा इच्छा होत नाही कित्येक ठिकाणी पाण्याची सुविधा केलेली आहे पण तेथे पाण्याची सोय नाही . ह्या सुविधा प्रथम प्रवाशांना पुरविणे जरुरीचे आहे . कर्मचाऱ्यांच्या सुद्धा अनेक मागण्या आहेत . त्यांना योग्य ती विश्राम गृहे हवीत . . अशा गोष्टी प्रलंबित असताना ई सुंदरी चा नवीन प्रयोग कितपत योग्य आहे ? एस टी मध्ये सोयी सुविधा चांगल्या पुरविल्या तर प्रवासी खुश होतील . तेव्हा नूतन अध्यक्षांनी याचा विचार करावा ही विनंती

**- शांताराम वाघ पुणे**

### मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याचा आनंद, पण....

मराठी माणसाला आनंद व अभिमान वाटावा असा क्षण मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला आहे. सरकारी कामात " इंग्रजी शिवाय पान " हालत नाही मराठी म्हणजे " कमी पणाचा" असा न्युनगंड वाढत होता. याला हे उत्तर आहे. मंत्रालयात आजही मराठी भाषा " उंबरठ्याबाहेरच" आहे. मंत्रालयातील कार्यालयीन कामकाजाचा वापर हा मराठीतुन कधी होणार ? हा आजही प्रश्नच आहे. मराठी भाषेला अभिजात दर्जा देण्यासाठी" ताटकळत" ठेवले तसे त्याची अमलबजावणी करण्यासाठी " ताटकळत "ठेऊ नये असे वाटते.केवळ केंद्र सरकारने" शिक्कामोर्तब " केले आहे. हे लक्षात घेणे गरजेचे आहे. आताच्या घडीला , उशीरा का होईना मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला याचा सार्थ आनंद महाराष्ट्रातील मराठी माणसांना वाटणे साहजिक आहे.पण त्याची अमलबजावणी वेळीच व्हावी.

**- अनंत दत्ताराम दाभोळकर.अंधेरी**

५ वृत्तमानस
ठाणे-रायगड
मुंबई, रविवार, ६ ऑक्टोबर २०२४

## पनवेल शहर पोलीस ठाण्याच्या समोर शेतकऱ्यांचे ठिय्या आंदोलन

**पनवेल :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ऑनलाईन पद्धतीने नैनाच्या कामांचे भूमिपूजन केले जाणार होते. त्याचा विरोध म्हणून शेतकऱ्यांनी ठीक ठिकाणी काळे झेंडे फडकवण्याचा निर्णय घेतला होता. याची माहिती पोलिसांना मिळताच पोलिसांनी नैना प्रकल्पग्रस्त शेतकरी उत्कर्ष समितीचे अध्यक्ष वामन शेळके, अनिल ढवळे यांना 5 ऑक्टोबर रोजी सकाळी ताब्यात घेतले. त्यांना तात्काळ सोडून द्यावे अशी मागणी माजी आमदार बाळाराम पाटील यांचेसह शेतकऱ्यांनी केली. मात्र पोलिसांनी त्यांना सोडले नाही. त्यामुळे ताब्यात घेतल्याचा निषेधार्थ शेकडो शेतकरी, महिला भगिनी पनवेल शहर पोलीस ठाण्यात समोर आले आणि त्यांनी त्या ठिकाणी ठिय्या आंदोलन सुरू केले. यावेळी जोरदार घोषणाबाजी करत नैनाचा, अधिकाऱ्यांचा निषेध करण्यात आला. नैनाला आमची साठ टक्के जागा फुकट का द्यायची असा सवाल देखील उपस्थित करण्यात आला. नैनाचे अधिकारी शेतावर मोजणी करण्यासाठी आल्यास त्यांना मारण्याचा देखील इशारा देण्यात आला.



### म ह त्त्वा चे

## सुभाष मोरे यांना मातृशोक



**नवी मुंबई :** शिक्षक भारतीचे कार्याध्यक्ष सुभाष मोरे यांच्या आई सावित्री किसन मोरे यांचे अल्पशा आजाराने ३ ऑक्टोबर २०२४ रोजी दु:खद निधन झाले. त्यांचे वय ६८ वर्षे होते. त्यांच्या मागे पती किसन हरी मोरे ,२मुले , १ मुलगी, जावाई, २ नातवंड ,१ नात असा परिवार आहे. त्यांचे गाव वारसोळी देव, ता. महाबळेश्वर ,जि. सातारा हे होते. नवी मुंबईत सिवूड येथे मुलगा सुभाष मोरे यांच्याकडे त्या राहत असत. नवी मुंबईत करावे गाव स्मशानभूमीत त्यांच्यावर आज (४ ऑक्टोबर )रोजी सकाळी ११ वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी माजी आमदार कपिल पाटील, राष्ट्र सेवा दलाचे विश्वस्त प्रा. जयवंत पाटील , शिक्षक भारतीच्या मुंबई अध्यक्ष कल्पना शेंडे , शिक्षक भारतीचे कर्यकर्त , मोरे परिवाराचे नातेवाईक आणि हितचिंतक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## नवी मुंबई पोलीस दलाच्या नावाचे एक्सवर बनावट खाते

**नवी मुंबई :** नवी मुंबईत मागील दोन वर्षात ऑनलाईन चोरीच्या घटना मोठ्या प्रमाणात घडत असून या चोरट्यांनी उच्चशिक्षित आणि धनिकांना आपले लक्ष्य केले आहे. कोट्यावधी रुपयांची चोरी ऑनलाईन चोरीचे सत्र सूरु असून दिवसाला एकतरी चोरीच्या घटना नोंद केल्या जात आहेत. मात्र या चो-या रोखण्यासाठी नवी मुंबई पोलीस असमर्थ ठरले असून गुरुवारी नवी मुंबई पोलीसांनी स्वताच नवी मुंबई पोलीसांच्या नावाने बनावट एक्स खाते सूरु केलेल्या व्यक्ती विरोधात सायबर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविला. त्यामुळे ऑनलाईन चोर हे पोलीसांवर शिरजोर झाल्याचे चित्र आहे. नवी मुंबई पोलीस दलाचे परिवर्तन काळानुरुप आधुनिक पोलीस दलात करण्यासाठी पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांनी कंबर कसली आहे. यासाठी आयुक्त भारंबे यांनी काही महाविद्यालयांमधील सायबर सूरक्षा विषयाच्या प्राध्यापकांच्या माध्यमातून पोलीस अधिकारी व कर्मचा-यांचे शिकवणीवर्ग सूरु करण्याचा प्रयोग केला.

## वाहतूक पोलिसांकडून दुचाकी चालक टार्गेट

**पनवेल :** पनवेल वाहतूक पोलिसांकडून दुचाकी चालकांना टार्गेट केले जात आहे. हेल्मेट न घातलेल्या दुचाकी चालकांना लक्ष केले जात आहे. मात्र अन्य वाहनांवर वाहतूक विभाग मेहरबान झाला आहे.पनवेल शहर वाहतूक पोलीस ठिकठिकाणी कारवाई करण्यासाठी नाक्यावर उभे आहेत. मात्र ते केवळ दुचाकींवरच कारवाई करताना दिसत आहेत. अनेक रिक्षा चालक विना वर्दी, विना लायसन्स, विना नंबर प्लेट आणि जास्त प्रवासी घेऊन प्रवास करतात. मात्र त्यांच्यावर वाहतूक पोलिसांकडून कारवाई केली जात नसल्याचे दिसत आहे. अनेक रिक्षा चालक सिग्नल तोडून पुढे जातात तर अनेकांच्या पाठीमागील नंबर प्लेटवर ऑइलचा डब्बा लावलेला असतो, जेणेकरून ऑनलाइन फाईन पोलिसांनी मारू नये. पनवेल, नवीन पनवेल परिसरात अनेक अवजड, अति अवजड वाहने येजा करतात. रेती-मातीने भरलेले ट्रक, हायवा यांच्यावर देखील वाहतूक विभाग मेहेरबान आहे. विद्यार्थी घेऊन जाणाऱ्या वाहनांमध्ये तर अनेक विद्यार्थी चेपून भरलेले असतात.

# मोदींच्या सभेला गर्दी जमवण्यासाठी शेकडो बसेस बुक; चाकरमान्यांचे हाल

## ठाणे बस स्थानकावर तुफान गर्दी



**प्रतिनिधी**
■ **ठाणे**

महिला सक्षमीकरण आणि लाडकी बहीण योजनेच्या कार्यक्रमांसाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी आज ठाणे दौऱ्यावर आहेत. ठाण्यातील घोडबंदर रोडवरील वालावलकर मैदानात आज जाहीर सभा होणार आहे. या पार्श्वभूमीवर प्रत्येक महापालिकेच्या परिवहन सेवेतील निम्म्यापेक्षा जास्त बसेस पंतप्रधानांच्या सभेला जाणार असल्याने प्रत्यक्ष रस्त्यावर फार कमी बसेस धावत आहेत. मोदींच्या या दौऱ्यामुळे चाकरमान्यांचे मात्र हाल झाले आहेत.

नवी मुंबई महापालिकेने 300, ठाणे महापालिकेने 250, मीरा-भाईंदर महापालिकेने 125 आणि कल्याण-डोंबिवली महापालिकेने 79 बसेस मोदींच्या सभेला महिलांना नेण्यासाठी वळवल्या आहेत. मोदींच्या सभेचा फटका सर्वसामान्य प्रवाशांना बसला असून आता ठाण्यातील स्टेशन परिसरातील बस स्टॉपवर चाकरमान्यांची तुफान गर्दी झालेली पाहायला मिळत आहे. कामासाठी जाणाऱ्या लोकांच्या अक्षरश: रांगा लागल्या आहेत. त्यामुळे कामाच्या ठिकाणी पोहोचेपर्यंत चाकरमान्यांच्या नाकी नऊ येणार आहेत. चाकरमान्यांना होणाऱ्या या त्रासामुळे नागरिकांनी मोदी सरकारचा निषेध केला आहे.

मोदींच्या कार्यक्रमासाठी टीएमटीच्या तब्बल 250 बस वळविण्यात आल्या असून फक्त 150 बसेस रस्त्यावर धावत असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली आहे. याशिवाय खारेगाव टोलनाका आणि कशेळी टोलनाकामार्गे ठाण्याकडे जाणाऱ्या अवजड वाहनांना बंदी घालण्यात आली आहे. शनिवारी रात्री 12 वाजेपर्यंत प्रवेश बंदी करण्यात आली असून सर्व ट्रान्सपोर्ट, वेअर हाऊस संघटना, वाहनचालक व मालकांना आदेश देण्यात आले आहेत.

# भिवंडीतील लॉजिस्टिक गोदामाला भीषण आग

## गोदामात रसायनांचा साठा



**प्रतिनिधी**
■ **भिवंडी**

मुंबई जवळील भिवंडी तालुक्यातील वालशिंद गावातील व्ही लॉजिस्टिकच्या गोदामाला भीषण आग लागली आहे. आगीची माहिती मिळताच आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी भिवंडी, कल्याण आणि ठाणे अग्निशमन केंद्रातून अग्निशमन दलाच्या सहा गाड्या रवाना करण्यात आल्या. अग्निशमन दलाचे जवान आग विझवण्याचा प्रयत्न करत आहेत. सुदैवाने आतापर्यंत या घटनेत कोणतीही जीवितहानी झाल्याचे वृत्त समोर आलेले नाही.

भिवंडीत भीषण आग लागण्याची ही घटना मुंबई-नाशिक महामार्गाजवळ घडली आहे. या आगीच्या घटनेत संपूर्ण गोदाम जळून खाक झाले असल्याचे स्थानिकांनी सांगितले. सध्या अग्निशमन दलाचे जवान आग विझवण्याचा प्रयत्न करत आहेत. आगीचे नेमके कारण अद्याप समोर आलेले नाही.

भिवंडीतील व्ही लॉजिस्टिक गोदामात हायड्रोलिक ऑईल, कापड, प्लास्टिकच्या वस्तू आणि रसायनांचा मोठा साठा ठेवण्यात आला होता. आगीमुळे गोदामात ठेवलेला सर्व माल जळून खाक झाल्याची माहिती सुत्रांनी दिली आहे. यामुळे किती रुपयांचा माल जळाला हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. तसेच आगीचे नेमके कारण देखील अद्याप कळालेले नाही. मात्र, सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाल्याचे वृत्त समोर आलेले नाही. स्थानिक पोलिस अधिक तपास करत आहेत.

# बदलापूर घटनेतील आरोपीच्या एन्काउंटरनंतर प्रश्न झाले उपस्थित

## रिकॉर्ड्स असलेले अन्य माफियांवर पोलिसांची मेहरबानी का?

**प्रतिनिधी**
■ **ठाणे**

बदलापूर लैंगिक शोषण प्रकरणातील आरोपी अक्षय शिंदे याचा मुख्यमंत्र्यांच्या जिल्हा पोलीस ठाण्यात एन्काउंटर झाल्यानंतर अन्य गुन्हेगारांबाबत पोलिसांच्या उदासीन कारवाईवर प्रश्न उपस्थित होऊ लागले आहेत. पोलीस ठाण्यात जुगार खेळून जनतेची लूट करणाऱ्या गुन्हेगारांचा सामना करण्याची हिंमत पोलीस दाखवू शकतील का, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते रूपेश रवी ढोणे यांनी मुख्यमंत्री आणि गृहराज्यमंत्र्यांसह वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांना पत्र लिहून केली आहे.

जिल्हा पोलिसांना रुपेश रविधोंने यांनी कारवाईसाठी अनेक ईमेल पाठवून ठाणे रेल्वे स्थानक पूर्व येथील कोपरी येथे सोशल क्लबच्या नावाने जुगार खेळणाऱ्या बाबू पाकमुत्तू नाडरवर शंभरहून अधिक गुन्हे दाखल असल्याची माहिती दिली आहे. तसेच माजिवडा येथील मटका जुगारचालक यांच्याकडून जुगार खेळून जनतेची लूट केली जात आहे. ठाणे रेल्वे स्थानक पश्चिम येथील सायकल स्टँडजवळ सोशल क्लबच्या नावाने राजेश घारू व अफजल, अनंता सोशल क्लबचा मालक विष्णू, डोंबिवली रेल्वे स्थानक-पूर्व-पश्चिम बंड्या मोरजकर, खडकपाडा, कल्याण येथील संदीप गायकवाड, रॉयल चॅलेंज समोर हॉटेल समुद्र बार सोशल क्लबच्या नावाने मालक मंगेश भोसले, ठाणे पोखरण रोड, वर्तक नगर पुलिस स्टेशनचा हद्द मध्य गोपाल शर्मा आणि अंबरनाथ रेल्वे स्थानक पश्चिमेतील जुगार चालक बन्सी यांच्यावर पोलिसांनी यापूर्वी डझनभर वेळा गुन्हे दाखल केले आहेत. या माफियांवर कारवाई करण्याची मागणी सामाजिक कार्यकर्ते रूपेश रवी ढोणे यांनी ठाणे जिल्ह्याचे सहपोलीस आयुक्त (गुन्हे) शिवराज पाटील यांच्याकडे केली आहे.

# नवी मुंबई बेलापूर विधानसभा मतदार यादीत प्रचंड घोळ

## मनसे झाली आक्रमक, निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार



**प्रतिनिधी**
■ **नवी मुंबई**

आगामी विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने निवडणूक आयोगाने मतदार यादी व त्याची पुरवणी यादी प्रकाशित केली आहे. नवी मुंबई १५१ बेलापूर विधानसभेमध्ये एकूण ४ लाख १५ हजार ४३६ नावे असून या सर्व मतदार याद्यांची सखोल छाननी करताना मनसेला काही गंभीर अनियमितता आढळून आल्याचे मनसे प्रवक्ते व शहर अध्यक्ष गजानन काळे यांनी म्हटले आहे.

सदर मतदार यादी मध्ये जवळपास १५ हजार नावे दुबार व जवळपास १८ हजार मतदार असे आहेत की ज्यांचा मतदार यादीतील पत्यानुसार शोध घेतला असता ते आढळून आलेले नसल्याचे शहर अध्यक्ष गजानन काळे यांनी म्हटले आहे. ही नावे कदाचित बोगस नोंदवलेली असल्याचे मनसेने म्हटले आहे. याबाबत मनसेच्या शिष्टमंडळाने निवडणूक निर्णय अधिकारी यांना भेटून मतदार याद्यांच्या पुराव्यांसह लेखी तक्रार दाखल केली आहे. अशा प्रकारच्या कारभारामुळे पारदर्शक व नि:ष्पक्ष निवडणूक ह्या संकल्पनेला छेद जात असल्याचे मनसेने आपल्या लेखी तक्रारीत म्हटले आहे. तसेच याबाबत निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडून सदर बोगस व दुबार नावे वगळली न गेल्यास याविरोधात कोर्टात जनहित याचिका दाखल करणार असल्याचे मनसे प्रवक्ते व शहर अध्यक्ष गजानन काळे यांनी प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे. याप्रसंगी मनसेच्या शिष्टमंडळात प्रवक्ते व शहर अध्यक्ष गजानन काळे, शहर सचिव विलास घोणे, सचिन कदम, सह सचिव अभिजित देसाई, मनपा कामगार सेनेचे आप्पासाहेब कोठुळे, विद्यार्थी सेनेचे संदेश डोंगरे, रोजगार सेनेचे सनप्रित तुर्मेकर, चित्रपट सेनेचे उपाध्यक्ष श्रीकांत माने, अनिकेत पाटील, रस्ते आस्थापनेचे संदीप गलुगडे, विभाग अध्यक्ष अमोल आयवळे उपस्थित होते.

# 2 चिमुकली मुलं अंबरनाथमधून गायब, कल्याणमधून अपहरण



**प्रतिनिधी**
■ **कल्याण**

अंबरनाथमधील दोन सख्ख्या भावंडांचा अपहरणाचा डाव कल्याण आणि पालघरच्या कासा पोलिसांनी हाणून पाडला. या मुलांचं अपहरण करून त्यांचा वापर भीक मागण्यासाठी आणि चोरीसाठी करण्यात येणार होता. पण त्याआधीच आरोपींचा हा डाव पोलिसांनी उधळून लावला.

चोरी किंवा भीक मागण्यासाठी मुलाचं अपहरण करणाऱ्या टोळीचा डाव पोलिसांनी शिताफीनं हाणून पाडला आहे. कल्याणच्या महात्मा फुले पोलिसांनी पालघरच्या येथील कासा पोलिसांच्या मदतीने ही कामगिरी पार पडली आहे. गस्तीवर असताना काही महिला आणि पुरुषांचं भांडण सोडवण्यासाठी पोलीस गेले. मात्र तिथे त्यांच्यासोबत असलेली दोन लहान मुलं बघून संशय आल्याने पोलिसांनी या टोळीला तब्यात घेतलं. त्यानंतर चौकशी केली असता ही दोन मुलं चोरी किंवा भीक मागण्याच्या कामासाठी वापर व्हावा म्हणून अपहरण करण्यात आलेली असल्याचा धक्कादायक प्रकार उघड झाला आहे.

या प्रकरणी विनोद गोसावी, आकाश गोसावी, अंजली गोसावी आणि चंदा गोसावी (सर्व रा. मिरज, सांगली) या चौघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अंबरनाथ येथे राहणाऱ्या अखिलेश प्रसाद मिश्रा यांची सूरज आणि सत्यम ही अनुक्रमे नऊ आणि सहा वर्षांची दोन मुलं घरातून बेपत्ता झाली. तशी तक्रार अखिलेश यांनी कल्याणच्या महात्मा फुले पोलीस ठाण्यात केली होती. या तक्रारीनंतर कल्याणचे पोलिस उपायुक्त अतुल झेंडे आणि वरिष्ठ पोलिस निरिक्षक ज्ञानेश्वर साबळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अधिकारी विनोद पाटील यांच्या पथकाने या प्रकरणाचा तपास सुरू केला. सीसीटीव्ही फुटेजच्या मदतीने तपास केला असता यात ही मुलं कल्याणमधून एका बसमध्ये बसून निघून गेल्याचं निदर्शनास आलं. त्या दिशेने हा तपास सुरू असतानाच पालघरच्या कासा पोलिस ठाण्यातून सुरज आणि सत्यम ही दोन्ही मुलं तिथे असल्याची माहिती मिळाली.

# उरण विधानसभेत शेकापची प्रचारात आघाडी

## 6 ऑक्टोबरला पदाधिकारी पदनियुक्ती मेळावा

**प्रतिनिधी**
■ **उरण**

महाराष्ट्र मध्ये लवकरच विधानसभेचे बिगुल वाजणार आहे काही ठिकाणी आघाडी होईल काही ठिकाणी मैत्रीपूर्ण लढत अशा परिस्थितीत आपण निवडून येणारच अशा ठिकाणी विविध पक्षांनी आपली मोर्चेबांधणी करण्यास सुरुवात केली आहे.

रायगड मधील उरण विधानसभा क्षेत्रात महाविकास आघाडी आणि महायुती यामध्ये लढत होणार आहे. यावेळी आपला पारंपारिक मतदारसंघ असल्यामुळे महाविकास आघाडी कडून उरण मधून शेतकरी कामगार पक्षालाच तिकीट मिळेल या अनुषंगाने शेतकरी कामगार पक्षाने उरण विधानसभा क्षेत्रात कंबर कसली आहे.

गणपती मध्ये लोकांच्या भेटीसाठी घेण्यामध्ये शेतकरी कामगार पक्षाचे उरणचे विधानसभेचे उमेदवार श्री. प्रितम जनार्दन म्हात्रे यांनी आघाडी घेतली आहे. जास्तीत जास्त कार्यकर्त्यांपर्यंत पोहोचून आपण केलेले काम लोकांपर्यंत पोहोचण्यासाठी त्यांनी प्रयत्न सुरू केले आहेत. त्यामुळेच आज शेतकरी कामगार पक्षाला नवचैतन्य निर्माण झाले आहे. खालापूर, पनवेल आणि उरण या तिन्ही तालुक्यांमध्ये येणाऱ्या गावांमध्ये भेटी देण्यात प्रितम म्हात्रे आघाडीवर आहेत. भेटी दरम्यान तरुण वर्गात त्यांच्या उमेदवारी बद्दल असलेला उत्साह शेतकरी कामगार पक्षातील तरुणांसोबतच आघाडी मधील इतर पक्षीय कार्यकर्त्यांमध्ये सुद्धा दिसून येत आहे.

या सर्व घडामोडी दरम्यान पक्ष संघटना बांधणीसाठी पक्षाच्या वरिष्ठ नेतृत्वाने प्रितम म्हात्रे यांच्यावर जबाबदारी दिली आहे. 6 ऑक्टोबर 2024 रोजी सकाळी 11.00 वाजता जेएनपीटी टाऊनशिप हॉल उरण येथे पक्षात नव्याने प्रवेश करते झालेले आणि अनुभवी असलेले जुने कार्यकर्ते यांचा नव्याने पक्ष बांधणी करतानाच नवनियुक्त पदाधिकारी मेळावा शेतकरी कामगार पक्षाने मा.आमदार श्री. बाळाराम पाटील आणि शेकाप नेते मा. नगराध्यक्ष श्री जे.एम. म्हात्रे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित केला आहे. यावेळी जास्तीत जास्त शेतकरी कामगार पक्षाच्या कार्यकर्त्यांनी उपस्थित राहावे असे आवाहन उरण तालुका चिटणीस श्री. विकास नाईक यांनी केले आहे.

> उरण विधानसभा हा आमचा शेतकरी कामगार पक्षाचा पारंपारिक मतदार संघ आहे. काही काळासाठी आमचा निसटता पराभव झाल्याने ही जागा पुन्हा मोर्चे बांधणी करून शेतकरी कामगार पक्षाचा आमदार महाविकास आघाडीच्या रूपाने निवडून आणण्यासाठी आम्ही सर्वजण काम करत आहोत. लवकरच उरण विधानसभेवर लालबावटा फडकला जाईल.
>
> **- प्रितम जनार्दन म्हात्रे**
> **खजिनदार, शेतकरी कामगार पक्ष रायगड**

# गांधींच्या वैचारिक औषधानेच अस्पृश्यता नष्ट होईल - डोंगरगावकर

## महात्मा गांधी जयंती निमित्ताने राबविले स्वच्छता अभियान



**प्रतिनिधी**
■ **नवी मुंबई**

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी अस्पृश्यता हिंदू धर्माला कलंक आहे. असे म्हटले होते.अस्पृश्यता समुह नष्ट झाली पाहिजे या मताचे महात्मा गांधी होते. आज सुध्दा त्यांच्यावर आणि त्यांच्या विचारांवर विश्वास ठेवून हिंदू चे हृदय परिवर्तन होणे आवश्यक आहे. स्वच्छता अभियानातून रस्ते व मैदानाची स्वच्छता होईल. पण अस्पृश्यता महात्मा गांधीच्या वैचारिक औषधानेच जाणार आहे. महात्मा गांधीनी हिंदू वर सोपवलेली आणि अस्पृश्याना दिलेली हमी कायदयाने नव्हे तर हिंदू ने त्यासाठी काम करणे हेच राष्ट्रपिता महात्मा गांधी यांना खरे अभिवादन असल्याचे प्रतिपादन प्रा. डॉ. जी. के. डोंगरगावकर यांनी केले.

खारघर येथील राहुल शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, सिध्दार्थ मल्टिपर्पज रेसिडेन्शल हायस्कूलच्या वतीने महात्मा गांधी यांच्या १५५ व्या जयंती दिनाच्या निमित्ताने स्वच्छता अभियानाचे आयोजन करण्यात आले होते. प्राचार्या नेहा राणे, एम. एल. सुर्यवंशी, सुजाता भोसले, वनिता सुर्यवंशी यांनी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचे जिवन आणि कार्य यावर सविस्तर मार्गदर्शन केले.

महात्मा गांधीचे विविध क्षेत्रातील योगदान आणि विशेषत: स्वातंत्र्याच्या चळवळीचे त्यांनी केलेले नेतृत्व हे विशेष योगदान आहे असे प्राचार्या नेहा राणे म्हणाल्या.

स्वच्छता अभियानात संस्थेच्या सत्याग्रह महाविदयालय, सत्याग्रह अध्यापक महाविदयालय, सिध्दार्थ मल्टिपर्पज रेसिडेन्शल हायस्कूलच्या विदयार्थी, शिक्षक यांनी भाग घेतला.

# 'स्वच्छता ही सेवा' पंधरवड्यात लाखो नवी मुंबईकरांचा विविध उपक्रमांत सक्रिय सहभाग

**प्रतिनिधी**
■ **नवी मुंबई**

केंद्र सरकारच्या 'स्वच्छ भारत मिशन'ने जाहीर केल्याप्रमाणे 'स्वच्छ महाराष्ट्र अभियान' अंतर्गत 'स्वच्छता ही सेवा' पंधरवड्यात 17 सप्टेंबरपासून 2 ऑक्टोबरपर्यंत महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली नवी मुंबई महानगरपालिकेने दररोज स्वच्छताविषयक नाविन्यपूर्ण उपक्रमांचे आयोजन केले. त्यामध्ये लाखो नवी मुंबईकर नागरिकांनी सामाजिक कर्तव्याची जाणीव ठेवत उत्साहाने सहभाग घेतला आणि हा पंधरवडा सर्वार्थाने यशस्वी केला.

लोकसहभागातही विशेषत्वाने ज्यांच्या खांद्यावर उद्याच्या नवी मुंबईची भिस्त आहे अशा विद्यार्थ्यांना यामध्ये सहभागी करून घेण्यात आले, ज्यायोगे विद्यार्थ्यांच्या माध्यमातून स्वच्छतेचा संदेश घराघरात गेला. नवी मुंबई महानगरपालिकेच्या अनेक उपक्रमांची केंद्रीय मिशनने त्यांच्या सोशल माध्यमांवर नवी मुंबईतील उपक्रमांना प्रदर्शित करून दखल घेतली.



15 सप्टेंबर पासूनच नवी मुंबई महानगरपालिकेने एक पेड माँ के नाम या अभिनव उपक्रमाव्दारे स्वभाव स्वच्छता, संस्कार स्वच्छता अभियानांतर्गत उपक्रम राबविण्यास सुरूवात केली. विशेष म्हणजे 300 देशी झाडांचे वृक्षारोपण करताना या उपक्रमामध्ये 170 हून अधिक तृतीयपंथी नागरिक सहभागी झाले होते.

17 सप्टेंबर रोजी अनंतचतुर्दशीच्या विसर्जनदिनी ठिकठिकाणी स्वच्छता मोहीमा राबविण्यात आल्या व पहाटेपर्यंत चाललेल्या विसर्जन सोहळ्यानंतर 18 सप्टेंबरला सकाळी 7 वा. शहरातील 22 मुख्य विसर्जनस्थळांवर 3 हजाराहून अधिक नागरिकांच्या सहभागातून सखोल स्वच्छता मोहीम राबवून अभियानाचा शुभारंभ करण्यात आला.

त्यापूर्वीच अभियानांतर्गत 2 ऑक्टोबरपर्यंत दररोज राबवावयाच्या उपक्रमांचे नियोजन करून वेळापत्रक तयार करण्यात आले होते. त्यानुसार शहरातील अत्यंत वर्दळीच्या रेल्वे स्टेशन, मार्केट, डेपो अशा 16 ठिकाणी स्वच्छतेवर जाणीव जागृती करणा-या पथनाट्यांचे आयोजन करण्यात आले होते. 20 सप्टेंबर रोजी प्लास्टिकमुक्त मार्केट व प्लास्टिकमुक्त सोसायटी अभियान सर्व विभागांमध्ये राबविण्यात आले. यावेळी प्लास्टिकचे दुष्परिणाम सांगताना पर्यायी कापडी पिशव्यांचे वाटपही करण्यात आले.

नवी मुंबईला विस्तृत खाडीकिनारा लाभलेला आहे. त्या अनुषंगाने जागतिक किनारपट्टी स्वच्छता दिनी 21 सप्टेंबर रोजी नवी मुंबईतील ठिकठिकाणच्या खाडीकिनारी खारफुटी स्वच्छता मोहीमांचे आयोजन करण्यात आले.


**मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ**
महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचे घटक मंडळ
म्हाडा MHADA

**ई-निविदा सुचना क्र. ११९ / २०२४-२५**

कार्यकारी अभियंता [ पश्चिम ] विभाग, मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ (महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचा घटक) खोली क्र. ५३७, चौथा मजला, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०००५१ ( दुरध्वनी क्र. ०२२६६४०५४३२) हे महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाकडे / सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र शासन / सिपीडब्लूडी / एमईएस / मुंबई महानगरपालिका / सिडको/ रेल्वे/ बीपीटी/एमआयडीसी / एम.जे.पी. यांचेकडे नोंदणीकृत ठेकेदाराकडून एकुण १० कामांकरीता बी - १ (Percantage Rate) नमुन्यातील ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेत स्थळावर http://mahatenders.gov.in, उपलब्ध असतील. सदर निविदेचे वेळापत्रक खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | टप्पा | कालावधी | अ.क्र. | टप्पा | कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | निविदा विक्री सुरू | ०७/१०/२०२४ सकाळी १०:३० वाजता | २ | निविदा विक्री बंद | १४/१०/२०२४ दुपारी ३:०० वाजता |
| ३ | तांत्रिक बोली उघडण्याचा दिनांक | १६/१०/२०२४ दुपारी ३:०५ नंतर | ४ | आर्थिक बोली उघडण्याचा दिनांक | १७/१०/२०२४ सकाळी १०:३० नंतर |

सक्षम प्राधिकारी यांनी एक किंवा सर्व निवदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार राखुन ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.
टिप : १. विस्तृत ई- निविदा सुचना उपरोक्त संकेतस्थळावर उपलब्ध असेल.
टिप : २. निविदा सुचनेबाबत शुध्दिपत्रक / बदल असल्यास फक्त संकेतस्थळावर प्रकाशित केले जातील.
CPRO/A/ 911

म्हाडा - गृहनिर्माण क्षेत्रातील देशातील अग्रगण्य संस्था
Follow us: @mhadaofficial

सही/-
कार्यकारी अभियंता (प),
मु. झो. सु. मंडळ, मुंबई

## तुळजाभवानी देवीची मानाची पालखी आज पाथर्डीत

**पाथर्डी :** कुलस्वामिनी आई तुळजाभवानी मातेची मानाची पालखी येत्या रविवारी (६ ऑक्टोबर) सायंकाळी शहरात दाखल होत असून, भाविकांच्या वतीने मिरवणुकीचे आयोजन केले आहे. कसबा विभागात दर्शन सोहळा होणार असल्याची माहिती समितीच्या वतीने मुख्य संयोजक अनिल साठे व अजय साठे यांनी दिली. ते म्हणाले, की कुलस्वामिनी आई तुळजाभवानी मातेची मानाची पालखी साडेतीन शक्तिपीठांपैकी पूर्ण शक्तिपीठ असलेल्या तुळजापूर येथील शारदीय नवरात्रोत्सवात सहभागी होते. मातेची चल मूर्ती गाभाऱ्यातून उचलून पालखीतून सीमोल्लंघन केले जाते. पालखीतून मंदिर प्रदक्षिणा केली जाते. हा सोहळा अतिशय भव्य दिव्य असतो. यावेळी पालखीचे दर्शनासाठी पालखीला स्पर्श करण्यासाठी लाखो भाविक प्रयत्नांची पराकाष्ठा करतात. ज्यांच्या नशिबी दर्शनाचे भाग्य असते, त्यांचाच हात पालखीला लागू शकतो, असे म्हटले जाते. पालखीतून मिरवणूक झाल्यानंतर मातेची मूर्ती कोजागिरी पौर्णिमेपर्यंत निद्रिस्त अवस्थेत ठेवली जाते. कोजागिरी पौर्णिमेला होमहवन संपन्न होऊन शारदीय नवरात्रोत्सवाची सांगता होते.



### म ह त्वा चे

## 30 जागा ब्राह्मण समाजाला द्या!

**पिंपरी :** आगामी विधानसभा निवडणुकीसाठी किमान ३० जागा ब्राह्मण समाजाला देण्याची मागणी राज्य महाराष्ट्र ब्राह्मण सभेचे अध्यक्ष डॉ. सचिन बोधनी यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. ब्राह्मण समाजाला गृहीत धरू नये, असा इशाराही देण्यात आला आहे. ब्राह्मण समाजाने आतापर्यंत भारतीय जनता पक्षाला नेहमीच संपूर्ण पाठिंबा दिला आहे. समाज भाजपच्या नेतृत्वावर पूर्ण विश्वास ठेवत आहे. मात्र, सध्या राज्यात ब्राह्मण समाजाच्या राजकीय प्रतिनिधित्वाची अत्यंत आवश्यकता आहे. राज्यातील ४५ विधानसभा मतदारसंघांमध्ये ब्राह्मण मतदारांची संख्या निर्णायक आहे. त्यापैकी किमान ३० जागांवर ब्राह्मण उमेदवारांना संधी मिळावी. पुण्यातील कोथरूड, कसबा, चिंचवड, ठाणे, कल्याण-डोंबिवली या मतदारसंघांमध्ये ब्राह्मण उमेदवार निवडून येण्याची क्षमता असलेले उमेदवार उपलब्ध आहेत. योग्यवेळी त्यांची नावे सादर केले जातील. गेल्या काही वर्षांत राज्यातील सामाजिक वातावरण बिघडवण्याचे प्रयत्न झाले आहेत. ज्यात ब्राह्मण समाजाला जाणीवपूर्वक लक्ष्य करण्यात आले.

## 5 वर्षांचा चिमुरड्यावर अत्याचार

**पुणे :** राज्यातील महिला अत्याचाराच्या चीड आणणाऱ्या घटना ताज्या असतानाच आता पुण्यातील कोंढवा परिसरात एक धक्कादायक घटना घडली आहे. येथील एका पाच वर्षांच्या मुलावर अल्पवयीन मुलांनीच अत्याचार केल्याचे समोर आले आहे. या घटनेमुळे कोंढवा परिसरात एकच खळबळ उडाली आहे. पुण्यात सलग तिसऱ्या दिवशी अत्याचाराची घटना समोर आली आहे. त्यामुळे या घटना रोखण्यासाठी आता करायचे असा प्रश्न पोलीस व्यवस्थेसमोर निर्माण झाला आहे. या अल्पवयीन मुलांनी पाच वर्षांच्या मुलाला प्रथम अश्लील व्हिडीओ दाखवला. त्यानंतर या अल्पवयीन मुलांनी तिच्यावर अत्याचार केला. पीडित मुलगा सोसायटीच्या आवारात खेळत होता. त्यावेळी तीन अल्पवयीन मुलांनी त्याला मोबाईलवर एक पॉर्न व्हिडीओ दाखवला. त्यानंतर पिडीत मुलाच्या मोठ्या भावासमोरच या अल्पवयीन मुलांनी संबंधित मुलावर अत्याचार केले. कोंढवा पोलिसांनी याप्रकरणी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरु आहे.

# सत्ताधारी महायुतीने महाराष्ट्राला कर्जबाजारी केलेय!

## जयंत पाटलांचा सावंतवाडीत सत्ताधाऱ्यांवर हल्लाबोल

प्रतिनिधी
■ सावंतवाडी

महाराष्ट्रात निवडणुका डोळ्यांसमोर ठेवून नवनवीन योजना आणल्या जात आहेत पण योजना पूर्ण करायला यांच्याकडे पैसे नसल्यानेच आता रिझर्व्ह बँकेकडे सव्वालाख कोटीचे कर्ज मागितले आहे. त्यामुळेच निवडणुका लवकर लागल्या पाहिजे अन्यथा महाराष्ट्रावर नऊ लाख कोटींचे कर्ज होईल आणि ते आपणास परवडणारे नाही, त्यामुळे महाराष्ट्रातील सरकार घालवा आणि सर्वसामान्यांचे सरकार आणा, असे आवाहन राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष आमदार जयंत पाटील यांनी केले.

शिवस्वराज्य यात्रेनिमित्त शनिवारी शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस गटाची जाहीर सभा सावंतवाडीतील गांधी चौकात पार पडली. यावेळी खासदार डॉ. अमोल कोल्हे, युवक अध्यक्ष सुनिल गव्हाणे, माजी मंत्री प्रविण भोसले, अर्चना घारे-परब आदी उपस्थित होत्या.



पाटील म्हणाले, आतापर्यंतच्या इतिहासात विद्यमान सरकारमध्ये चालला तसा भष्ट्राचार जनतेने कधीच पाहिला नव्हता. इव्हेंटचे सरकार झाले आहे. लाडकी बहीण योजना आणली, पण बहीण सुरक्षित राहिली तरच योजना चालणार पण सांगणार कोण? महिला सुरक्षा महत्त्वाची आहे. फक्त राज्यावर कर्जाचा डोंगर उभा राहात आहे, आता नव्या योजनांसाठी सव्वालाख कोटींचे कर्ज मागितले आहे. त्यामुळे निवडणुका लवकर झाल्या पाहिजेत कर्ज, घ्यायचे तरी बंद करतील, नाहीतर राज्यावर नऊ लाख कोटींचे कर्ज होईल, अशी भिती पाटील यांनी व्यक्त केली.

पाटील यांनी यावेळी दिपक केसरकर यांच्यावर जोरदार टीका केली. ते म्हणाले, दिवाळी आली तरी शालेय विद्यार्थ्यांना गणवेश नाही, यांना फक्त लाडका कॉन्ट्रक्टर हवा आहे. पण मुलांचे गणवेश नको. आपल्या मतदारसंघात पंधरा वर्षांपूर्वी ज्या घोषणा केल्या त्या आजही पूर्ण झाल्या नाहीत त्यामुळेच 'नवो आमदार हवो', असे म्हणत केसरकर यांची खिल्ली उडवली, तसेच जाणीव जागर यात्रेत मिळालेल्या प्रतिसादाबद्दल अर्चना घारे-परब यांचे कौतुक केले. काँग्रेस, उद्धव ठाकरे सेनेला विनंती करून सावंतवाडी मतदारसंघात बदल घडवून आणू, असा विश्वासही पाटील यांनी व्यक्त केला आहे.

खासदार कोल्हे यांनीही मंत्री केसरकर यांच्यावर 'जाकिटवाला' असे जोरदार टीकास्त्र सोडले. ते म्हणाले, त्यांची अवस्था जादुगारासारखी झाली आहे, पण आता ही जादू चालणार नाही. जनतेला कळून चुकले आहे त्याच त्या घोषणा ऐकून जनता कंटाळली आहे, त्यामुळेच येथे बदल घडवण्याचे काम सावंतवाडीतील जनतेचे आहे. आमदार दमदार हवा पण गद्दार नको त्यामुळे गद्दारांना धडा शिकवा, असे आवाहनही कोल्हे यांनी केले. डॉ अमोल कोल्हे म्हणाले, महाराष्ट्रात एक फुल्ल दोन

### राज्यावरील कर्ज लवकरच 9 लाख कोटींचे होईल...

हाफ आहेत. त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार सोडले त्यामुळेच मालवणमधील पुतळा पडला. या सरकारने सर्वच क्षेत्रात भ्रष्टाचार केला असून त्यातूनही महाराजांना सोडले नाही, यांचे वस्त्रहरण करण्याची वेळ आली आहे. यांना माफी नाही असे आवाहन करत यांनी पन्नास खोके घेतले आणि लाडक्या बहिणींना पंधराशे रुपये देतात, मुलांना गणवेश मिळत नाही, दोन वर्षे तोच गणवेश घालतात यावरून येथील शिक्षणमंत्र्यांनी बोध घ्यावा, हवेतील बाता करू नये. केसरकर १५ वर्षे आमदार व ७ वर्षे मंत्री आहेत. त्यांना आता आराम करू द्या, आता 'बदल हवो तर नवीन आमदार नवो', असे आवाहन करून अर्चना घारे यांनी परब यांच्या कामाचे कौतुक केले.

# जालना, संभाजीनगरमध्ये NIA, ATS ची धडक कारवाई

## दोघांना घेतले ताब्यात; जैश-ए-मोहम्मदशी संबंध असल्याचा संशय



प्रतिनिधी
■ जालना

महाराष्ट्रात सणउत्सवांना सुरुवात झाली आहे. सध्या नवरात्रोत्सव सुरू आहे. तसेच विधानासभा निवडणुकीचाही महोल आहे. अशातच मराठवाड्यात जालना आणि छत्रपती संभाजीनगर येथील वेगवेगळ्या भागात एनआयए अर्थात राष्ट्रीय तपास संस्थेचे पथक व एटीएसच्या पथकाने आज 5 ऑक्टोबर रोजी पहाटे तीन वाजेच्या सुमारास मोठी कारवाई केली आहे. एनआयएने दोघांना ताब्यात घेतल्याची माहिती आहे.

देश-विरोधी कृत्यांमध्ये सहभागी असल्याच्या कारणावरून एनआयएने ही कारवाई केली आहे. दोन्ही पथक पहाटेच शहरात दाखल झाले आणि धडक करवाई करण्यात आली. यामध्ये शेख नदीम समद सौदागर यास ताब्यात घेण्यात आले असून जैशे-ए-मोहम्मद संघटनेचे सदस्य असल्याची माहिती समोर आली आहे. यावेळी गांधीनगर भागामध्ये पोलिसांचा मोठा फौजफाटा तैनात करण्यात आला आहे.

छत्रपती संभाजीनगरमध्येही शहरातील वेगवेगळ्या भागात राष्ट्रीय तपास एजन्सीच्या (एनआयए) पथकाने छापेमारी सुरू केली आहे. या पथकाने काहीजणांना तपासासाठी ताब्यात घेतले आहे. राज्यात एनआयएच्या पथकाने एकाच वेळी छापेमारी सुरू केली आहे. छत्रपती संभाजीनगरातील आझाद चौक परिसरात पथकाने रात्री उशिरा छापेमारी सुरू करत काही तरुणांना चौकशीसाठी ताब्यात घेतले आहे. या कारवाई किती जणांची चौकशी केली याबाबत माहिती देण्यास पथकाने नकार दिला आहे. रात्री एक वाजेनंतर सुरू केलेली ही कारवाई सकाळी नऊ पर्यंत सुरू होती. या कारवाईत स्थानिक एटीएस पथकातील अधिकारी कर्मचाऱ्यांचा देखील समावेश असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

# विद्यार्थांना घेऊन जाणारी स्कूलबस उलटली, बसमध्ये होते 60 विद्यार्थी

प्रतिनिधी
■ चंद्रपूर

चंद्रपूर जिल्ह्यातील गडचांदूर येथे लालबहादूर शास्त्री विद्यालयाची बस हरदोना गावानजीक उलटली. यात सुमारे वीस विद्यार्थी जखमी झाले आहेत. या बसमध्ये 60 विद्यार्थी होते. विद्यार्थ्यांना घेऊन ही बस शाळेकडे निघाली होती. मात्र वाटेत चालकाचे नियंत्रण सुटले आणि रस्त्याच्या कडेला उलटली. सुदैवाने यात कोणतीही जीवित हानी झालेली नाही. जखमी विद्यार्थ्यांना गडचांदूर येथील ग्रामीण रुग्णालयात हलविण्यात आले असून उपचार



सुरू आहेत.

बसमध्ये तब्बल ६० विद्यार्थी होते. दरम्यान स्कूल बस हरदोना गावानजीक आली असता चालकाचं बसवरील नियंत्रण सुटलं. चालकाला बस थांबवता आली नाही आणि काही क्षणात बस रस्त्याच्या बाजूला जावून उलटली.

# हिंदु राष्ट्र समन्वय समितीच्यावतीने मुख्यमंत्री व गृहमंत्री यांच्यासह 4 पोलीस ठाण्यात तक्रारी दाखल

प्रतिनिधी
■ मंचर

इस्रायल आणि आतंकवादी संघटना हिजबुल्ला यांच्यात चालू असलेल्या युद्धात या संघटनेचा म्होरक्या सय्यद हसन नसरुल्ला याला इस्रायलने ठार केले. हिजबुल्लाला अमेरिका आणि अन्य ६० देशांनी 'आतंकवादी संघटना' म्हणून घोषीत केले आहे. असे असतांना छत्रपती शिवाजी महाराजांच्या जन्मभूमीत अर्थात् जुन्नर गावात (ता. जुन्नर, जिल्हा पुणे येथे) सय्यद हसन नसरूल्ला या आतंकवाद्याला 'मानवतेसाठी लढणारा शहिद' असल्याचा मोठे



होर्डिंग्ज लावून ३ ऑक्टोबरला घटस्थापनेच्या पवित्र दिवशी 'काळा दिन' साजरा करण्यासाठी मोर्चाही काढण्यात आला.

जुन्नरमध्ये असे देशविघातक आणि देशद्रोही कृत्य करणाऱ्या मुख्य सूत्रधाराला शोधून सर्व दोषींच्या विरोधात तातडीने कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी 'हिंदू राष्ट्र समन्वय समिती'ने केली आहे. या संदर्भात महाराष्ट्र राज्याचे मा. मुख्यमंत्री, मा. गृहमंत्री, पोलीस अधीक्षक पुणे ग्रामीण, तसेच तळेगाव, मंचर आणि कोल्हापूर शहारातील राजारामपुरी पोलीस ठाण्यात तक्रारी नोंदवण्यात आल्या आहेत.

# अमरावतीत दगडफेक, 21 पोलिस जखमी

## 1200 जणांवर गुन्हा दाखल

प्रतिनिधी
■ अमरावती

महाराष्ट्रातील अमरावती येथील नागपुरी गेट पोलिस स्टेशनवर शुक्रवारी रात्री उशिरा दगडफेक झाली. त्यात 21 पोलिस जखमी झालेत. पोलिसांनी अश्रुधुराच्या नळकांड्या फोडत परिस्थिती नियंत्रणात आणली.

29 सप्टेंबर रोजी गाझियाबादमध्ये नरसिंहानंद महाराज यांनी प्रेषित मोहम्मद यांच्याविरोधात वादग्रस्त वक्तव्य केले होते. त्यामुळे संतप्त झालेल्या जमावाने पोलिसांवर दगडफेक केली.

अमरावतीचे पोलिस आयुक्त नवीन चंद्र रेड्डी यांनी सांगितले की, रात्री 8.15 च्या सुमारास काही लोक नागपुरी गेट पोलिस ठाण्यात नरसिंहानंद यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यासाठी आले. स्टेशन प्रभारींनी त्यांना सांगितले की, नरसिंहानंद यांच्या विरोधात आधीच एफआयआर नोंदवण्यात आला आहे. त्यानंतर हा जमाव परतला.

काही वेळाने एक जमाव पोलिस ठाण्यात आला. त्यांनी घोषणाबाजी सुरू केली. पोलिस स्टेशनच्या अधिकाऱ्यांनी त्यांना शांत करण्याचा प्रयत्न केला, पण त्यांनी दगडफेक सुरू केली. या घटनेत 21 कर्मचारी जखमी झाले आणि 10 व्हॅनचे नुकसान झाले.



हल्ला करणाऱ्या 1,200 जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यापैकी आतापर्यंत 26 जणांची ओळख पटली आहे. त्यांच्याविरुद्ध बीएनएस कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अमरावतीच्या पोलिस आयुक्तांनी सांगितले की, वरिष्ठ अधिकाऱ्यांनी घटनास्थळी जाऊन परिस्थितीचा आढावा घेतला. त्यानंतर नागपुरी गेट पोलिस ठाण्यात तातडीने पोलिस बंदोबस्त वाढविण्यात आला. परिसरात बीएनएस कलम 163 लागू करण्यात आले आहे. 5 ते 6 पेक्षा जास्त लोकांवर एकत्र येण्यास बंदी घालण्यात आली आहे.

पोलिसांनी सांगितले की, यती नरसिंहानंद महाराज यांच्याविरुद्ध नागपूरी गेट पोलिस ठाण्यात IPC कलम 299 (कोणत्याही वर्गाच्या धर्माचा अपमान करून धार्मिक भावना दुखावण्याच्या हेतूने जाणूनबुजून आणि द्वेषपूर्ण कृत्य), 302 (जाणूनबुजून धार्मिक भावनांचा अपमान करणे) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यती नरसिंहानंद सरस्वती यांचे खरे नाव दीपक त्यागी आहे. केमिकल टेक्नॉलॉजीमध्ये पदवी घेण्यासाठी ते 1989 मध्ये मॉस्कोला गेले. त्यांनी मॉस्कोमध्येच अभियंता म्हणून काम केले. 1997 मध्ये ते भारतात परतले. 1998 मध्ये निवृत्त झाल्यानंतर दीपक त्यागी यांनी त्यांचे नाव बदलून दीपेंद्र नारायण सिंह केले. पुढे ते यती नरसिंहानंद गिरी या नावाने ओळखले जाऊ लागले.

# वाढत्या अत्याचाराच्या घटना रोखण्यासाठी गस्त वाढवा!

## उपसभापती डॉ. गोऱ्हे यांची पोलिसांना सुचना

प्रतिनिधी
■ पुणे

पुणे शहरात तसेच परिसरात गेल्या काही दिवसात महिलांवरील अत्याचाराच्या वाढत्या घटना लक्षात घेता पोलीस विभागाने अधिक सतर्क राहून अत्याचाराच्या घटना रोखण्यासाठी पोलीसांची गस्त वाढवावी, असे निर्देश विधानपरिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी दिले. पोलीस आयुक्त कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत डॉ. गोऱ्हे बोलत होत्या. यावेळी पुणे शहर पोलीस आयुक्त अमितेश कुमार उपस्थित होते.

डॉ. गोऱ्हे म्हणाल्या, पुणे शहर आणि परिसरात महिलांवरील




अत्याचाराच्या घटना वाढत आहेत. ही बाब अत्यंत चिंताजनक असून पोलीसांनी आरोपींना पकडून त्यांच्यावर तात्काळ कारवाई करावी. बोपदेव घाट, दिवे घाट, वेताळ टेकडी, एनडीए परिसर तसेच अन्य निर्जन स्थळी नागरिकांच्या संरक्षणासाठी गस्त वाढवावी. निर्जन स्थळी पोलीस चौकी अद्यावत करावे. तसेच या ठिकाणी रात्रीच्या वेळी प्रभावशील प्रकाश झोताची आणि भोंग्यांची व्यवस्था करावी. अशा ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे लावून त्याची वेळोवेळी देखरेख व्हावी. याबाबतची माहिती सुरक्षिततेच्या दृष्टिने नागरिकांना होणे गरजेचे आहे. यासाठी पुरेशी प्रसिद्धी द्यावी अशी सूचना त्यांनी यावेळी दिली.

# रामराजे नाईक-निंबाळकर 'तुतारी' हाती घेण्याची शक्यता

प्रतिनिधी
■ फलटण

विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांचे सासरे तथा विधान परिषदेचे माजी सभापती रामराजे नाईक निंबाळकर यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश करणार असल्याचा दावा सूत्रांनी केला आहे. ते लवकर फलटणमध्ये आपल्या समर्थकांचा मेळावा घेऊन आपली पुढील दिशा स्पष्ट करणार



आहेत. त्यांच्या या भूमिकेमुळे उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष अजित पवार यांना जोरदार झटका बसण्याची शक्यता आहे.

रामराजे नाईक निंबाळकर हे फलटण विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढवण्याच्या तयारीत होते. पण अजित पवार यांनी येथून दीपक चव्हाण यांची उमेदवारी जाहीर केली. त्यामुळे नाराज होऊन निंबाळकर यांनी शरद पवारांच्या राष्ट्रवादीचा मार्ग धरल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. रामराजे नाईक निंबाळकर हे राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आहेत. ते 2015 ते 2016 व 2016 ते 7 जुलै 2022 पर्यंत विधानपरिषदेचे अध्यक्ष होते. राष्ट्रवादी काँग्रेसच्या फुटीवेळी त्यांनी अजित पवारांसोबत जाणे पसंत केले. पण आता विधानसभा निवडणुकीच्या ऐन तोंडावर ते पुन्हा शरद पवाराकंडे परतण्याची शक्यता आहे.

# ॲनिमियाचे सहज निदान करणाऱ्या 'इझीचेक'ला अंजनी माशेलकर फाऊंडेशनचा पुरस्कार

प्रतिनिधी
■ पुणे

सध्या भारतातील 3 पैकी 2 महिला आणि लहान मुले ॲनिमियाच्या (म्हणजेच रक्तातील हिमोग्लोबिनची कमतरता) सुप्त साथीने ग्रस्त आहेत. ॲनिमियावर उपचार करणे तुलनेने सोपे आहे, परंतु त्याचे निदान करणे हीच मोठी समस्या आहे. पारंपरिक चाचणी पद्धती ही सुईचा वापर करून, महागडी आणि दुर्गम भागातील लोकांना सहजपणे उपलब्ध होत नाही. त्यामुळे ॲनिमियाचे निदान केले जात नाही. यावर हमखास स्वस्तात निदान करणारे तंत्रज्ञान 'इव्हीआयएक्स हेल्थ टेक'चे संस्थापक पार्थ प्रतीमदास महापात्रा यांनी 'इझीचेक' नावाने विकसित केले असून या तंत्रज्ञानाला यावर्षीचा (14 वा) अंजनी माशेलकर इन्क्लुझिव्ह इनोव्हेशन पुरस्कार देण्यात येणार आहे.

अंजनी माशेलकर फाऊंडेशनच्या वतीने मुख्य विश्वस्त आणि ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर यांनी गांधी जयंतीच्या निमित्ताने ही घोषणा केली.



अंजनी माशेलकर



पार्थ महापात्रा

एक लाख रु. आणि सन्मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरुप आहे. येत्या 17 नोव्हेंबर रोजी पुण्यात होणाऱ्या फाऊंडेशनच्या वार्षिक सोहळयात नामवंत प्रमुख अतिथींच्या हस्ते महापात्रा यांना हा पुरस्कार प्रदान केला जाणार आहे असेही डॉ. माशेलकर यांनी सांगितले. इव्हीआयएक्स कंपनीने ॲनिमियाच्या निदानासाठी एक अभूतपूर्व, अत्यंत परवडणारे, कुठेही नेता येणारे आणि वापरण्यास सोपे असे तंत्रज्ञान आणि उपकरण 'इझीचेक'च्या माध्यमातून विकसित केले आहे, या उपकरणामुळे सुई टोचून रक्त न घेता केवळ स्कॅनिंग करून हिमोग्लोबीन मोजता येते आणि त्यामुळे ॲनिमियाचे निदान तातडीने करणे शक्य होते.

2011 मध्ये स्थापन झालेल्या अंजनी माशेलकर फाऊंडेशनने आजपर्यंत अशा 15 क्रांतिकारक नवकल्पनांचा सन्मान केला आहे. प्रसिद्ध शास्त्रज्ञ आणि विचारवंत, पद्मविभूषण डॉ. रघुनाथ माशेलकर यांनी त्यांच्या मातोश्री अंजनी माशेलकर यांच्या 'गरीबांसाठी विज्ञानाचा उपयोग करण्याच्या' इच्छापूर्तीच्या उद्देशाने हे फाऊंडेशन स्थापन केले आहे. या पुरस्काराची घोषणा करताना डॉ. माशेलकर म्हणाले की, ॲनिमियामुळे गर्भवती मातांसाठी गंभीर समस्या निर्माण होते. भारतात जवळपास 60% महिला, किशोरवयीन मुली आणि लहान मुले ॲनिमियाने ग्रस्त असताना, आपला देश त्याच्या क्षमतेच्या निम्म्याच प्रमाणात यावर काम करीत आहे.

'इझीआरएक्स'चे हे इझीचेक उपकरण उपकरण म्हणजे 'गांधीवादी अभियांत्रिकी'चे एक नवीन उदाहरण असून त्यामुळे 'स्वस्तात अधिक लोकांसाठी, अधिक' हा गांधीवादी अभियांत्रिकीचा मंत्र जपला जात आहे, अशीही भावना त्यांनी व्यक्त केली. 'इझीआरएक्स'ने भारतातील 17 राज्यांमध्ये ॲनिमियाबाबतची 23 लाखांहून अधिक स्कॅन पूर्ण केली असून 'ॲनिमियामुक्त भारत' आणि 'राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम' यांसारख्या प्रमुख शासकीय उपक्रमांमध्ये महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. केंद्रीय औषध मानक नियंत्रण संस्थेद्वारा प्रमाणित हे उपकरण भारताव्यतिरिक्त इतर तीन विकसनशील देशांमध्ये देखील वापरले जात आहे. 'इझीआरएक्स'चे संस्थापक महापात्रा यांची आता याबाबत अधिक व्यापक संशोधन करण्याची कल्पना आहे. 'आर्थिक विषमतेतील दरी कमी करण्यासाठी विविध उपाय शोधण्याच्या नवकल्पनांवर भर देणे या अंजनी माशेलकर फाऊंडेशनच्या ध्येयाशी पूर्णतः सुसंगत अशी ही कल्पना आहे.

# आमदार देशमुखांनी घेतली मनोज जरांगेंची भेट

## संभाजीनगरमध्ये जाऊन केली तब्येतीची विचारपूस

प्रतिनिधी
■ संभाजीनगर

लातूर ग्रामीणचे आमदार धिरज विलासराव देशमुख यांनी मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांची संभाजी नगर येथे भेट घेतली. काही दिवसांपूर्वी मनोज जरांगे पाटील यांनी आपले बेमुदत उपोषण स्थगित केले होते. तेव्हापासून त्यांच्यावर संभाजीनगर येथील गॅलेक्सी हॉस्पिटलमध्ये उपचार सुरु आहेत. आमदार धिरज विलासराव देशमुख यांनी बुधवारी (दि.३) त्यांची भेट घेऊन तब्येतीची विचारपूस केली.

यावेळी आमदार धिरज विलासराव देशमुख यांनी गॅलेक्सी हॉस्पिटलचे डॉ. विनोद चावरे व त्यांच्या टीमसोबत मनोज जरांगे पाटील यांच्यावरील उपचाराविषयी



जाणून घेतले. मनोज जरांगे पाटील यांच्याबरोबर आरक्षण प्रश्नाविषयी चर्चाही केली.

मनोज जरांगे पाटील हे सर्वसामान्य मराठा समाजाच्या न्याय, हक्कासाठी लढाई लढत आहेत. मराठा आरक्षणाची मागणी केल्यापासून आणि आंदोलनाच्या सुरुवातीच्या काळापासून आम्ही मनोज जरांगे पाटील यांच्या सोबत आहोत, असे आमदार धिरज विलासराव देशमुख यांनी यावेळी म्हटले.

गुन्हेमागेघ्या,एसआयटीरद्दकरा मराठा आरक्षणाचा प्रश्न तात्काळ मार्गी लावावा, मराठा आंदोलकांवर दाखल केलेले गुन्हे मागे घ्यावेत, मनोज जरांगे पाटील यांच्यावर नेमलेली एसआयटी चौकशी रद्द करावी अशी मागणीही आमदार धिरज देशमुख यांनी सरकारकडे केली आहे.

## महिला बचत गटाच्या अध्यक्षा सोनवणे आणि पाताडे यांची स्वच्छता दूत म्हणून निवड

**मुंबई :** बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून राबविल्या जात असलेल्या दीनदयाळ अंत्योदय योजना, राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान अंतर्गत स्थापित सोनिया महिला बचत गटाच्या अध्यक्षा रेणुका सोनवणे, सदिच्छा महिला बचत गटाच्या अध्यक्षा सीमा पाताडे यांची स्वच्छता दूत म्हणून निवड करण्यात आली आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत नवी दिल्ली येथे पार पडलेल्या 'स्वच्छ भारत दिवस, स्वच्छ भारत अभियान' कार्यक्रमात या दोघींनी काल ( सहभाग नोंदविला. या निवडीबद्दल महानगरपालिका प्रशासनाकडून दोन्हीही महिलांचे अभिनंदन करण्यात आले. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीच्या पार्श्वभूमीवर आयोजित संपूर्ण देशभरात 'स्वच्छता ही सेवा' अभियान राबविले जात आहे. याच अभियान अंतर्गत नवी दिल्ली येथील विज्ञान भवन येथे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत 'स्वच्छ भारत दिवस, स्वच्छ भारत अभियान'चा १० व्या वर्धापन दिन सोहळा पार पडला. या कार्यक्रमासाठी देशातील ३२ राज्यातून महिला स्वच्छतादूतांची निवड करण्यात आली. बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे राबविल्या जात असलेल्या दीनदयाळ अंत्योदय योजना, राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान अंतर्गत स्थापित सोनिया महिला बचत गटाच्या (जी उत्तर विभाग) अध्यक्षा रेणुका सोनवणे, सदिच्छा महिला बचत गटाच्या (पी उत्तर विभाग) अध्यक्षा सीमा पाताडे यांची या कार्यक्रमात स्वच्छता दूत म्हणून निवड करण्यात आली. सोनिया आणि सदिच्छा हे दोन्ही महिला बचत गट 'स्वच्छ मुंबई प्रबोधन अभियान' अंतर्गत घरोघरी जाऊन कचरा गोळा करणे व वस्ती स्वच्छतेची कामे करतात.

# मुंबईने लखनौत जिंकली इराणी ट्रॉफी : 27 वर्षांनंतर विजेता

## सरफराज खान सामनावीर, कोटियनचे शतक



वृत्तसंस्था
■ लखनौ

लखनौच्या एकना स्टेडियमवर आज इराणी ट्रॉफीचा शेवटचा दिवस होता. शेष भारताला हरवून मुंबईने 27 वर्षानंतर इराणी करंडक पटकावला आहे. कर्णधार अजिंक्य रहाणेच्या संघाने ट्रॉफी जिंकली आहे.

द्विशतक हुकलेल्या सरफराज खानला सामनावीर म्हणून गौरवण्यात आले. सामन्याच्या पाचव्या दिवशी तनुष कोटियनने शतक झळकावले. 9व्या विकेटसाठी कोटियन आणि मोहित अवस्थी यांच्यात 163 चेंडूत 123 धावांची भागीदारी झाली.

मुंबईने पहिल्या डावात 121 धावांची आघाडी घेतली होती. पहिल्या डावात मुंबईने 10 गडी गमावून 537 धावा केल्या होत्या. पहिल्या डावात शेष भारताचा संघ केवळ 416 धावा करू शकला. दुसऱ्या डावात मुंबई संघाने आठ गडी गमावून 329 धावा केल्या.

मोहित अवस्थी आणि तनुष कोटियन यांनी नवव्या विकेटसाठी 200 चेंडूत 158 धावांची भागीदारी केली. पहिल्या डावात आघाडी मिळवल्यानंतर मुंबई संघाने शेष भारताला दुसरा डाव खेळण्याची संधी दिली नाही.

मुंबई संघाने शेष भारतावर 450 धावांची आघाडी घेतली होती. मुंबईची ही 16 वी इराणी ट्रॉफी आहे. मुंबईने एक ट्रॉफी दुसऱ्या संघासोबत शेअर केली आहे.

इराणी ट्रॉफी जिंकल्यानंतर मुंबईचा कर्णधार अजिंक्य रहाणे म्हणाला की, आम्ही वानखेडेवरही लाल मातीच्या खेळपट्टीवर खेळतो. खेळपट्टी कशी असेल याची आम्हाला कल्पना होती. तनुष कोटियनने शानदार खेळ दाखवला.

शेष भारताचा कर्णधार ऋतुराज गायकवाड म्हणाला की, सरफराज आणि तनुष यांच्यात चांगली भागीदारी होती. शार्दुलनेही पहिल्या डावात काही धावा जोडल्या. त्यामुळे अडचण वाढली. ध्रुव जुरेल, अभिमन्यू ईश्वरन यांनी चांगला खेळ केला. सरांश जैनने दुसऱ्या डावात चांगली गोलंदाजी केली.

दुसऱ्या डावात मुंबईची पहिली विकेट 52 धावांवर पडली. पृथ्वी शॉने अर्धशतक केले. 105 चेंडूत 76 धावा करून तो बाद झाला. या डावात 8 चौकार आणि एक षटकार मारला. यानंतर सरांश जैन आणि मानव सुधार या जोडीने ठराविक अंतराने विकेट घेतल्या.

# माझी माऊली चषक कॅरम स्पर्धेत दुर्वांक, वेदांत, मयांक, स्वस्तिक तिसऱ्या फेरीत




प्रतिनिधी
■ मुंबई

सार्वजनिक नवरात्र महोत्सव मंडळ-जेजे व आयडियल स्पोर्ट्स अकॅडमी आयोजित आंतर शालेय १६ वर्षाखालील मुलांच्या विनाशुल्क कॅरम स्पर्धेत भरडा हायस्कूल-फोर्टचा दुर्वांक शेलार, डॉ. शिरोडकर हायस्कूल-परेलचा वेदांत हळदणकर, जेकब ससून हायस्कूल-नागपाडाचा मयांक सोळंकी, सेंट जोसेफ हायस्कूल-डोंगरीचा स्वस्तिक सुर्वे आदींनी तिसऱ्या फेरीत प्रवेश केला. दुर्वांक शेलारने सेंट मेरी हायस्कूल-माझगावच्या वेदांत मोरेचा ७-४ असा चुरशीचा पराभव करून दुसरी फेरी जिंकली. मुंबई शहर व उपनगर, ठाणे, पालघर, रायगड आदी जिल्ह्यामधील शालेय ६४ खेळाडूंमध्ये सामने रंगत आहेत.

जे.जे. हॉस्पिटल कंपाऊंड-भायखळा येथे सुरु झालेल्या शालेय कॅरम स्पर्धेत वेदांत हळदणकरने ब्लॉसम हायस्कूल-मरीन लाईन्सच्या संचित जगतापचे आव्हान ९-१ असे संपुष्टात आणतांना प्रतिस्पर्ध्यावर सुरुवातीपासून आघाडीचे दडपण निर्माण केले.

अन्य सामन्यात सेंट मेरी हायस्कूलच्या जितेंद्र जाधवने तन्मय चव्हाणचा १०-६ असा, मयांक सोळंकीने सार्थक गुजरचा १४-४ असा, सेंट जोसेफ हायस्कूल-डोंगरीच्या स्वस्तिक सुर्वेने तनिष पवारचा १४-० असा तर ह्यूम हायस्कूल-नागपाडाच्या आदेश महाडिकने अमेय सोळंकीचा ७-५ असा पराभव करून तिसरी फेरी गाठली. २४ व्या शालेय कॅरम स्पर्धेचे सातत्य राखत मंडळाने सबज्युनियर कॅरमपटूना प्रोत्साहन देण्यासाठी चॅम्पियन कॅरम बोर्डावर दर्जेदार स्पर्धेचे पूर्णपणे मोफत आयोजन केले आहे.

# अंनिसच्या शहीद भगतसिंग वक्तृत्व स्पर्धेत शौर्या राणे हीने पटकावला प्रथम क्रमांक

प्रतिनिधी
■ नवी मुंबई

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, बेलापूर नेरूळ शाखेने आयोजित केलेली सातवी शहीद भगतसिंग वक्तृत्व स्पर्धा बेलापूर येथील पीपल्स एज्युकेशन सोसायटीचे सेंट्रल स्कूल येथे २ ऑक्टोबर रोजी उत्साहात पार पडली. या वक्तृत्व स्पर्धेत ज्ञानदीप सेवा मंडळाचे हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय मधील शौर्या राणे ही विद्यार्थिनी प्रथम आली. तिने महिला व मुली असुरक्षित का आहेत, या विषयावर आपले विचार मांडले.

या वक्तृत्व स्पर्धेत विद्या भवन सेकंडरी इंग्लिश स्कूल नेरूळ मधील सुहानी कांबळे हिने 'बुवाबाजीचे बळी' या विषयावर बोलून दुसरा क्रमांक पटकावला तर तिसरा क्रमांक स्नेहा विजय सावंत, शिरवणे विद्यालय हिने 'करू नका नशा विझून जाईल आशा' या विषयावर बोलून मिळवला. उत्तेजनार्थ बक्षीसे आरोही नितीन म्हात्रे व अंजली मंडल यांना मिळाली या वक्तृत्व स्पर्धेत नवी मुंबईच्या १५ शाळातील 67 विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला

वक्तृत्व स्पर्धेचे उद्घाटन पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या सेंट्रल स्कूलचे मुख्याध्यापक भास्कर पवार सर यांनी करणीचा नारळ फोडून त्यातून निघालेली फुले महात्मा गांधींच्या फोटोला वाहात केले. तसेच रमेश साळुंखे व रेखा देशपांडे यांनी स्पर्धेचे सूत्रसंचालन केले. तर संजय उबाळे, श्रद्धा जाधव, लेखा देशपांडे, त्रिशीला कांबळे, अर्चना शिंदे, राहुल शिंदे,प्रशांत भोर व काळूराम जाधव यानी परीक्षक म्हणून काम पाहिले.

# श्री स्वामी समर्थ, गोलफादेवी प्रतिष्ठान याच्या विजयाने शिवनेरी मंडळाच्या कबड्डी स्पर्धेला प्रारंभ

### कुमार गटात साऊथ कॅनरा, श्रीराम विश्वस्त, शिवमुद्रा, विजय क्लब यांची विजयी सलामी.



प्रतिनिधी
■ मुंबई

श्री स्वामी समर्थ, गोलफादेवी प्रतिष्ठान यांच्या महिला गटातील विजयाने शिवनेरी सेवा मंडळाने आयोजित केलेल्या कबड्डी स्पर्धेला प्रारंभ. कुमार गटात साऊथ कॅनरा, श्रीराम विश्वस्त, शिवमुद्रा, विजय क्लब यांनी विजयी सलामी दिली. मुंबई शहर कबड्डी असो. च्या मान्यतेने दादर (पूर्व) येथील भवानीमाता क्रीडांगणावर सुरू झालेल्या या ५६व्या कबड्डी महोत्सवात श्री स्वामी समर्थने उद्घाटनिय सामन्यात शताब्दी स्पोर्ट्सचा ३६-०९ असा सहज पराभव केला.

स्वामी समर्थने आक्रमक सुरुवात करीत पूर्वार्धात २लोण देत २३-०५ अशी आघाडी घेतली. उत्तरार्धात आणखी एक लोण देत आपली आघाडी वाढविली. शेवटी २६ गुणांच्या मोठ्या फरकाने आपला विजय साकारला. साक्षी जंगम, साक्षी गिलबिले यांच्या झंजावाती चढाया त्याला सई शिंदेची मिळालेली पकडिची साथ यामुळे हे शक्य झाले. दुसऱ्या सामन्यात गोलफादेवी प्रतिष्ठानने अमर भारतला ४२-२१ असे नमविले. विश्रांतीला २४-०९ अशी आघाडी घेणाऱ्या गोलफादेवीला नंतर मात्र अमर भारतने बऱ्यापैकी लढत दिली. गोलफादेवीच्या अस्मिता जंगमने एकाच चढाईत ३गडी टिपत महत्त्वाची भूमिका बजावली. तिला सोनल नाईकने चढाईत, तर रचना म्हात्रेने पकडीत मोलाची साथ दिली.

कुमार गटात साऊथ कॅनराने यंग प्रभादेवीचा ४७-२६ असा पाडाव केला. गुरुप्रसाद पवार, चिरोबा लिंगकर यांच्या चढाई पकडीच्या खेळामुळे त्यांना हा विजय शक्य झाला. यंग प्रभादेवी कडून जयेश कोंढाळकरने एकाकी लढत दिली. श्रीराम विश्वस्तने अंकुश पारवे, अथर्व यांच्या चढाई पकडिच्या खेळाने सिद्धी प्रभा फाउंडेशनचा ४०-२४ असा सहज पराभव केला.

सिद्धी प्रभाचा शैलेश तरवसे चमकला. शिवमुद्रा प्रतिष्ठानने अमर हिंद मंडळाला ४१-२१ असे नमवित आगेकूच केली. विशाल लाड, विवेक चव्हाण शिवमुद्राच्या विजयाचे शिल्पकार ठरले. अमर हिंदचा सयोग रेवाळे बरा खेळला. विजय क्लबने संस्कृती प्रतिष्ठान वर ४०-२४ असा विजय मिळविला. रोहन राज, शिवम यादव यांच्या चतुरस्त्र खेळाने विजय क्लबने पूर्वार्धात २१-१४ अशी आघाडी घेतली. उत्तरार्धात तोच जोश कायम राखत १६गुणांनीआपला विजय साकारला.

रोशन राई, ललित यादव यांनी संस्कृती कडून उत्तम खेळ करीत त्यांना कडवी लढत दिली. इतर सामन्यात नवोदित संघाने विजय बजरंग व्यायाम शाळेला ४३-३० असे, तर एस.एस.जी. फाउंडेशनने गुड मॉर्निंगला ४७-३५ असे पराभूत करीत आगेकूच केली. या स्पर्धेचे उद्घाटन आमदार सचिनभाऊ अहिर, शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त जया शेट्टी आणि छाया शेट्टी(बांदिवडेकर) यांच्या उपस्थितीत पार पडले.

# प्रलंबित वारसाहक्क/अनुकंपा प्रकरणे निकाली काढण्यासाठी घनकचरा व्यवस्थापन विभागाचे शिबिर

## संबंधित पालिका अधिकारी, कर्मचारी आणि अर्जदारांना उपस्थित राहण्याचे आवाहन

प्रतिनिधी
■ मुंबई

बृहन्मुंबई महानगरपालिकेत मागील ५ वर्षांतील प्रलंबित वारसाहक्क/अनुकंपा पी. टी. प्रकरणे निकाली काढण्यासाठी महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाच्या वतीने ३ ते ८ ऑक्टोबर २०२४ या कालावधीदरम्यान 0 पालिका मुख्यालयात दररोज सकाळी ११ वाजेपासून शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरासाठी संबंधित अधिकारी, कर्मचारी तसेच अर्जदारांनी उपस्थित राहण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेतील कोणतीही वारसाहक्क/अनुकंपा पी. टी. प्रकरणे प्रलंबित राहणार नाही, या अनुषंगाने तात्काळ कारवाई करावी, असे निर्देश महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक श्री. भूषण गगराणी यांनी दिले आहेत. या पार्श्वभूमीवर, अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर) डॉ. (श्रीमती) अश्विनी जोशी यांच्या मार्गदर्शनात उप आयुक्त (घनकचरा व्यवस्थापन) (अतिरिक्त कार्यभार) श्री. किरण दिघावकर यांच्या देखरेखीखाली प्रलंबित वारसाहक्क, अनुकंपा पी. टी. प्रकरणे तात्काळ निकाली काढण्याच्या उद्देशाने शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

केंद्र आणि राज्य शासनाच्या निर्देशानुसार, राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीच्या पार्श्वभूमीवर आयोजित 'स्वच्छता ही सेवा' अभियान अंतर्गत बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वतीने विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. याचाच एक भाग म्हणून या शिबिराचे आयोजन करण्यात येत आहे. असेही पालिकेने ही म्हटले आहे.

०३ ते ०८ ऑक्टोबर २०२४ दरम्यान शिबिराचा पहिला टप्पा म्हणजेच परिमंडळ-१ मधील विविध प्रशासकीय विभाग कार्यालयांमधील प्रलंबित प्रकरणांबाबत शिबिर घेण्यात येणार आहे. उप आयुक्त (घनकचरा व्यवस्थापन) कार्यालय, तिसरा मजला, विस्तारित इमारत, महानगरपालिका मुख्यालय, मुंबई येथे हे शिबिर आयोजित करण्यात आले आहे. या अंतर्गत ३ ऑक्टोबर २०२४ रोजी 'ए विभाग', ४ ऑक्टोबर २०२४ रोजी 'डी विभाग', ७ ऑक्टोबर २०२४ रोजी 'बी आणि सी विभाग', ८ ऑक्टोबर २०२४ रोजी 'ई विभाग' कार्यालयांतील प्रलंबित प्रकरणांबाबत शिबिर घेण्यात येईल. या वेळापत्रकानुसार संबंधित विभागातील अधिकारी, कर्मचारी तसेच अर्जदारांनी सकाळी ११ वाजता महानगरपालिका मुख्यालयात उपस्थित राहावे, असे महानगरपालिका प्रशासनाकडून कळविण्यात आले आहे.



*मुंबई : भारतीय जनता पार्टी मुंबई सचिव कामगार नेते जितेंद्र राऊत (भाई) यांची सिद्धिविनायक मंदिर ट्रस्ट, प्रभादेवी येथे विश्वस्त पदावर नियुक्ती झाल्याबद्दल राऊत यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव सुरु झाला आहे. अखिल भारतीय लॉटरी विक्रेता संघटनेचे अध्यक्ष अनुज बाजपेयी, उपाध्यक्ष महेन्द्र दिघे, सचिव आशिष मुणगेकर यांच्यासह अन्य सदस्य आणि भाजपा कार्यकर्त्यांनी जितेंद्र राऊत (भाई) यांची भेट घेऊन त्यांचे अभिनंदन करत पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या आहेत.*

# तब्बल 22 वर्षांनी येथील रस्ते झाले प्रकाशमय



प्रतिनिधी
■ मुंबई

गोरेगांव पूर्व येथील प्रभाग क्रमांक ५२ मधील यशोधाम येथील नवभारत सहयोग सोसायटी परिसरात मागील २२ वर्षांपासून रस्त्यांवर दिवे नसल्याने हा परिसर अंधारात होता. या भागात तब्बल 800 ते 900 नागरिक रहात आहेत. पण प्रिती सातम या नगरसेविका झाल्यानंतर येथील रस्त्यांवर पथ दिवे बसवण्याची मागणी करत महापालिकेशी पाठपुरावा केला होता. याला यश आले आणि शुक्रवारी येथील पथ दिवे प्रत्यक्षात सुरू झाले आणि ही वस्ती आणि हा परिसर प्रकाशमय झाला...

तब्बल २२ वर्षानी येथील रहिवाशांनी या रस्त्यांवरील रात्रीचा प्रकाश अनुभवला. नगरसेविका म्हणून हे काम मला करता आले आणि या परिसराला प्रकाशमान करता आले याचा अत्यंत आनंद होत आहे. अशी प्रतिक्रिया प्रिती सातम यांनी व्यक्त केली.

# खा. संजय दिना पाटील यांच्या पाठपुरवठ्याला यश

## माहुलमध्ये कायमस्वरुपी होणार पालिकेचे रुग्णालय

प्रतिनिधी
■ मुंबई

माहुलगावात कायमस्वरुपी प्रसूतिगृह व दवाखाना सुरु करण्याचा निर्णय महापालिकेच्या आरोग्य विभागाने घेतला आहे. यासाठी इमारत बांधण्यात येणार असून त्याची प्रक्रिया निविदाव्दारे सुरु करण्यात आली आहे. ईशान्य मुंबई महाविकास आघाडीचे खासदार संजय दिना पाटील यांनी याबाबत पालिका तसेच मुंबई उपनगरचे पालकमंत्री मंगलप्रभात लोढा यांच्यासमोर वारंवार हा प्रश्न उपस्थित करुन माहुल मध्ये रुग्णालय तसेच स्वच्छतेबाबत कार्यवाही करण्यास सांगितले होते. जिल्हा नियोजन समितिच्या बैठकीत ही मंत्री लोढा यांना याबाबत जाब विचारण्यात आला होता. मुलुंड ते घाटकोपर दरम्यान राहणा-या अनेक नागरिकांचे पुनर्वसन माहुल मध्ये करण्यात आले आहे. त्या नागरिकांनी याबाबत खा. संजय दिना पाटील यांना भेटून आपली व्यथा मांडली होती. गोवंडी, चेंबुर, आरसीएफ या भागात प्रदुषणामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. क्षयरोग, अस्थमा, कर्करोग, चर्मरोग, केसगळती यांसारख्या आजाराने अनेकांना ग्रासले असून अनेकांना आपले जीव गमवावा लागला आहे. त्यातच पाण्याची समस्या, घाणीचे साम्राज्य त्यामुळे माहुलकरांचे आरोग्य धोक्यात आले आहे. शिवाय उपचार करण्यासाठी एकही सुसज्ज असे रुग्णालय या भागात नसल्याने माहुल गांव, वाशीनाका, आरसीएफ या भागात राहणा-या नागरिकांना राजावाडी किंवा सायन, केईएम रुग्णालयात जावे लागत आहे. माहुल गावात राहणारे बहुतांस नागरिक हे ईशान्य मुंबईतील आहेत. पाईप लाईन किंवा रस्ता रुंदीकरणात आलेल्या लोकांचे माहुल गावात पुनर्वसन करण्यात आले आहे. मात्र, या ठिकाणी काहीच नागरी सेवा-सुविधा नसल्याने अनेकांनी खासदार संजय दिना पाटील यांच्याकडे तक्रार केली होती. याबाबत खा. संजय पाटील यांनी जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत पालकमंत्री मंगलप्रभात लोढा यांच्यासमोर हा प्रश्न उपस्थित केला होता.

# झोपडपट्टीतील शाळांच्या मान्यतेसाठी मंत्री दीपक केसरकर यांची व्यवस्थापन प्रतिनिधींनी घेतली भेट



प्रतिनिधी
■ मुंबई

मुंबईतील झोपडपट्टी भागातील शाळांना मान्यता देण्यासाठी सुधारित निकशांची मागणी स्कूल मॅनेजमेंट फेडरेशन माध्यमातून शासनाकडे करण्यात आली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष सलीम सारंग यांच्या नेतृत्वाखालील शाळा व्यवस्थापन महासंघाच्या प्रतिनिधीने महाराष्ट्रातील विशेषतः मुंबईतील झोपडपट्टी भागातील शाळांसमोरील आव्हानांबाबत शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांची भेट घेतली. शासनाने या शाळांसाठी 5,000 चौरस फूट जमीन, 30 वर्षांचा भाडेपट्टा करार, 7/12 सर्वेक्षण अहवाल आणि 20 लाख रुपयांची मुदत ठेव यासारखे विद्यमान मान्यता निकष आव्हानात्मक असल्याचे निदर्शनास आणले. सध्याच्या संचमान्यतेच्या नियमांमुळे या भागातील 674 शाळा आणि एक लाख विद्यार्थ्यांच्या शिक्षणात अडथळा येत असल्याचा गंभीर मुद्दा प्रतिनिधींनी उपस्थित केला आहे. यावेळी स्कूल मॅनेजमेंट फेडरेशनच्या सरचिटणीस शबाना खान, अध्यक्ष प्रकाश चऱ्हाते, व्हीके इंग्लिश स्कूलचे विश्वस्त शबाना खान, सिटीझन इंग्लिश स्कूलचे विश्वस्त सईद खान, एज्युकेअर इंग्लिश स्कूलचे विश्वस्त रिजवान अन्सारी, ऑक्सफर्ड इंटरनॅशनल स्कूलचे विश्वस्त रईस खान, अल्फा इंग्लिश स्कूलचे विश्वस्त कमरुन्निसा शेख, इमॅन्युएल स्कूलच्या विश्वस्त रिबेका असादे, जोहर आयडियल स्कूलच्या विश्वस्त मुखतार शेख, मरियम इंग्लिश स्कूलच्या विश्वस्त शबाना अन्सारी, स्टार अंजुमन इंग्लिश स्कूलचे विश्वस्त मोहम्मद रिझवान, गोल्ड फिल्ड्स इंग्लिश स्कूलचे विश्वस्त इश्तियाक, विश्वस्त देवेंद्र हांडे, विश्वस्त डॉ. प्रेरणा इंग्लिश स्कूलचे प्रतिनिधी उपस्थित होते.

**मुलांच्या शिक्षणासाठी मंत्र्यांचे आश्वासन**

मंत्री दीपक केसरकर यांनी या प्रकरणाचा विचार करून लवकरच निर्णय घेतला जाईल, असे आश्वासन दिले आहे. गरीब व वंचित मुलांच्या शिक्षणाबाबत हे सरकार नेहमीच सकारात्मक निर्णय घेण्याचा मानस असल्याचे ते म्हणाले. गेल्या आठवड्यात आमच्या शिष्टमंडळाने उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह प्रदेश उपाध्यक्ष सलीम सारंग यांची भेट घेतली. अजितदादांनी तातडीने शिक्षणमंत्र्यांसोबत ही बैठक आयोजित करून कोणत्याही परिस्थितीत मुलांचे शिक्षण थांबवायचे नाही, असे आश्वासन दिल्याचे सारंग यांनी सांगितले.

**मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ**
**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचे घटक मंडळ**
म्हाडा MHADA

**ई-निविदा सूचना क्र. १२१ / २०२४-२५**

कार्यकारी अभियंता [ पश्चिम ] विभाग, मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ (महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचा घटक) खोली क्र. ५३७, चौथा मजला, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१ ( दुरध्वनी क्र. ०२२६६४०५४३२) हे महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाकडे / सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र शासन/सिपीडब्लूडी / एमईएस/मुंबई महानगरपालिका / सिडको / रेल्वे / बीपीटी / एमआयडीसी / एम. जे. पी. यांचेकडे नोंदणीकृत ठेकेदाराकडून एकुण ३ कामांकरीता बी १ (Percantage Rate) नमुन्यातील ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेत स्थळावर http://mahatenders.gov.in, उपलब्ध असतील. सदर निविदेचे वेळापत्रक खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | टप्पा | कालावधी | अ.क्र. | टप्पा | कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | निविदा विक्री सुरू | ०७/१०/२०२४ सकाळी १०:३० वाजता | २ | निविदा विक्री बंद | १४/१०/२०२४ दुपारी ३:०० वाजता |
| ३ | तांत्रिक बोली उघडण्याचा दिनांक | १६/१०/२०२४ दुपारी ३:०५ नंतर | ४ | आर्थिक बोली उघडण्याचा दिनांक | १७/१०/२०२४ सकाळी १०:३० नंतर |

सक्षम प्राधिकारी यांनी एक किंवा सर्व निवदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार राखुन ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.
टिप : १. विस्तृत ई- निविदा सुचना उपरोक्त संकेतस्थळावर उपलब्ध असेल.
टिप : २. निविदा सुचनेबाबत शुध्दिपत्रक / बदल असल्यास फक्त संकेतस्थळावर प्रकाशित केले जातील.
**CPRO/A/ 912**

म्हाडा - गृहनिर्माण क्षेत्रातील देशातील अग्रगण्य संस्था
Follow us: @mhadaofficial

सही/-
कार्यकारी अभियंता (प),
मुं. झो. सु. मंडळ, मुंबई



श्री महालक्ष्मी मंदिर नवरात्रौत्सव मंडळ आग्रीपाडा मुंबई 11



सार्वजनिक नवरात्रौत्सव मंडळ, शिवकृपा नगर, कांजूर वर्ष ३९ वे अध्यक्ष बाबा कदम



आग्रिपाडा सार्वजनिक नवरात्रौत्सव मंडळ ( भायखळा)



अलिबाग तालुक्यातील वाघ्रण या गावातील महालक्ष्मी अंबाबाई

# संविधानात छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार - राहुल गांधी

वृत्तसंस्था
कोल्हापूर

छत्रपती शिवाजी महाराजांसारख्या थोर महापुरुषांचे फक्त पुतळे उभारून चालत नाही तर त्यांच्या आचार विचारांचे पालन करावे लागते. शिवाजी महाराज हे ज्या कार्यासाठी लढले, जगले त्यातील थोडे तरी आपण आत्मसात केले पाहिजे. शिवाजी महाराजांनी सर्व जाती धर्माच्या लोकांना सोबत घेऊन महान कार्य केले व अन्यायाविरुद्ध लढा दिला. छत्रपती शिवाजी महाराज यांचे विचारच देशाच्या संविधानात आहेत, असे सांगून छत्रपती शिवाजी महाराज व राजर्षी शाहू महाराज नसते तर हे संविधान नसते असे प्रतिपादन लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केले आहे.

कोल्हापुरातील कसबा बावडा भागात राहुल गांधींच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण करण्यात आले यावेळी ते बोलत होते. ते पुढे म्हणाले की, देशात दोन विचारधारा आहेत, एक विचार धारा देश जोडणारी, सर्वांना सोबत घेऊन काम करणारी तर दुसरी विचारधारा संविधान संपवणारी आहे. ही विचारधारा लोकांना घाबरवते, ह्या विचारधारेचे लोक शिवाजी महाराजांना नमस्कार करतात पण त्यांच्या विचारांचे पालन करत नाहीत. याच विचारधारेने शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक केला नाही. त्यांनी शिवाजी महाराजांचा पुतळा बनवला पण तो काही दिवसातच कोसळली. ही राजकीय लढाई नाही तर विचाराची लढाई आहे, असे राहुल गांधी म्हणाले.

लोकसभेतील विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांनी कोल्हापूरच्या उचगाव येथे टेम्पोचालक अजित तुकाराम संधे यांच्या घरी जाऊन



## राहुल गांधींच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण

त्यांच्याशी व त्यांच्या कुटुंबियांशी चर्चा केली. तसेच छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुर्णाकृती पुतळ्याचे अनावरण केल्यानंतर महाराजांना अभिवादन केले.

यावेळी बोलताना विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार म्हणाले की, शिवाजी महाराज जुलमी, अत्याचारी राजवटी विरोधात लढले. चंद्र, सुर्य असेपर्यंत राजेंचे नाव कायम राहणार आहे. छत्रपती शिवाजी महाराज हे रयतेचे राजे होते. शेतक-यांच्या भाजीच्या देठालाही हात लावू नका अशी त्यांची शिकवण होती, परस्त्रीला मातेसमान मानणारा हा राजा होता. अशा या महान दैवताचा राजकोट येथील पुतळा कोसळल्याने ज्या वेदना झाल्या तो महाराष्ट्र व शिवप्रेमी जनता कधीही विसरणार नाही. कसबा बावडा येथील छत्रपती शिवाजी महाराजांचा हा पूर्णाकृती पुतळा आपल्या सर्वांना प्रेरणा देत राहिल.

खासदार शाहू महाराज म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराज यांचा समतेचा विचार आपल्याला पुढे घेऊन जायचा आहे. शिवाजी महाराजांच्या सैन्यात सर्व जाती धर्माचे लोक होते, तेंव्हापासूनच धर्मनिरपेक्षतेची सुरुवात झाली आहे.

विधान परिषदेतील गटनेते व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे संकल्पक आ. सतेज पाटील यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. यावेळी त्यांनी या पुतळ्याच्या संकल्पनेची व रचनेची माहिती दिली. खा. राहुल गांधी यांच्या मनातील राज्य महाराष्ट्रात आणू असा विश्वास सतेज पाटील यांनी व्यक्त केला व नवरात्र महोत्सवाच्या शुभेच्छा दिल्या.

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याचे संकल्पक विधान परिषदेचे गटनेते आमदार सतेज उर्फ बंटी पाटील असून शिल्पकार सचिन घारगे, पाचगाव तालुका करवीर, जिल्हा कोल्हापूर आहेत.

या कार्यक्रमाला प्रभारी रमेश चेन्नीथला, प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, विधिमंडळ पक्षनेते बाळासाहेब थोरात, विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, माजी मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे, पृथ्वीराज चव्हाण, गोव्याचे प्रभारी माणिकराव ठाकरे, खासदार शाहू महाराज, विधान परिषद गटनेते सतेज उर्फ बंटी पाटील, खासदार चंद्रकांत हंडोरे, प्रणिती शिंदे, रजनी पाटील, CWC सदस्य व प्रदेश कार्याध्यक्ष नसीम खान, अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे सचिव बी. एम. संदीप, कुणाल चौधरी, काझी निजामुद्दीन, बी.वी. व्यंकटेश, आ. भाई जगताप, युवक काँग्रेसचे अध्यक्ष कुणाल राऊत, NSUI चे आमीर शेख, प्रदेश उपाध्यक्ष संघटन व प्रशासन नाना गावंडे आदी उपस्थित होते.

# पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या हस्ते 23300 कोटींच्या विविध उपक्रमांचा आरंभ

## बंजारा समाजाची स्वातंत्र्यलढ्यात महत्वाची भूमिका, मोदींकडून कौतुक

वृत्तसंस्था
वाशिम,

बंजारा समाजाने देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात महत्वाची भूमिका निभावली. देशाच्या विकासासाठी प्रत्येक क्षेत्रात या समाजाने काम केले. समाजाने खूप संत दिले. या संतांनी देशाच्या आध्यात्मिक क्षेत्राला उर्जा दिली. बंजारा विरासत संग्रहालयामुळे समाजाची महान संस्कृती, प्राचीन परंपरा देशाच्या नवीन पिढीला परिचित होईल, असे प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केले

वाशिम जिल्ह्यातील पोहरादेवी येथे प्रधानमंत्र्यांच्या हस्ते बंजारा विरासत संग्रहालयाचे उद्घाटन, किसान सन्मान संमेलन तथा विविध विकासकामांचे लोकार्पण, लाभाचे वितरण झाले. त्यावेळी प्रधानमंत्री बोलत होते. यावेळी राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे,




केंद्रीय कृषि मंत्री शिवराज सिंग चौहान, मत्स्यपालन व पशुसंवर्धन मंत्री राजीव रंजन सिंह उर्फ ललन सिंह, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव, राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहीर, पालकमंत्री संजय राठोड, ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन, कृषी मंत्री धनंजय मुंडे, खा.अनुप धोत्रे, आ.चंद्रशेखर बावनकुळे, आ.निलय नाईक, आ.भावना गवळी, आ.किरण सरनाईक, आ.लखन मलिक, आ.वसंत खंडेलवाल, जिल्हा परिषद अध्यक्ष चंद्रकांत ठाकरे आदी उपस्थित होते.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी म्हणाले ,बंजारा समाजाच्या विरासत संग्रहालयाचे उद्घाटन करण्याचे भाग्य लाभले. उद्घाटनानंतर समाजातील काही लोकांना भेटलो. संग्रहालयामुळे त्यांच्या चेहऱ्यावर आनंद दिसून आला. या कार्यक्रमासाठी उपस्थित सर्वांनी या संग्रहालयाला भेट द्यावी, असे आवाहन करतो. देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या मुख्यमंत्री पदाच्या काळात या संग्रहालयाच्या विकासासाठी प्रयत्न केले, त्यामुळे त्यांचे कौतुक करतो. संग्रहालयामुळे समाजाची महान संस्कृती, प्राचिन परंपरा देशाच्या नवीन पिढीला परिचित होईल, असे प्रधानमंत्री म्हणाले.

बंजारा समाजातील महापुरुषांनी देशासाठी खूप मोठे योगदान दिले. राजा लकी सिंग, संत सेवालाल महाराज, स्वामी हाती राम, संत रामराव बापू महाराजांसह अनेक संत, महंतांनी समाजाला निर्णायक नेतृत्व दिले व उत्तम मार्गदर्शन केले. केंद्र शासन या समाजाच्या विकासासाठी कार्य करीत आहे. राज्य शासनाने संत सेवालाल तांडा समृद्धी अभियान राबवून या समाजाला सक्षम करण्यासाठी महत्त्वाचे पाऊल उचलले, असल्याचे प्रधानमंत्री म्हणाले. नवरात्रीच्या शुभमुहूर्तावर पीएम किसान सन्मान निधी योजनेचे पैसे शेतकऱ्यांच्या खात्यात वितरित करण्याचे भाग्य मला मिळाले आहे. केंद्राच्या योजनेसोबतच महाराष्ट्र सरकार शेतकऱ्यांना नमो शेतकरी महासन्मान योजनेतून निधी देत असल्याने येथील शेतकऱ्यांना दुप्पट लाभ होत आहे. महाराष्ट्र सरकारने ५० हजार करोड रुपयांच्या वैनगंगा -नळगंगा नदी जोड प्रकल्पाला मंजूरी दिली आहे. या प्रकल्पामुळे नागपूर, वर्धा, अमरावती, यवतमाळ, अकोला, बुलढाणा या जिल्ह्यांतील १० लाख एकर जमीन सिंचनाखाली येणार आहे.

सोयाबीन आणि कापूस उत्पादक शेतकऱ्यांना महाराष्ट्र सरकार मदत करत आहे. अमरावती येथील नुकतेच टेक्सटाईल पार्कचे उद्घाटन झाले. राज्य शासनाने सुरु केलेली मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना नारी शक्तीला सशक्त करणारी योजना असल्याचे प्रधानमंत्र्यांनी सांगितले.

# संबंध सुधारण्यासाठी पाक दौऱ्यावर जात नाहीय- जयशंकर

वृत्तसंस्था
नवी दिल्ली

शांघाय कोऑपरेशन ऑर्गनायझेशन (SCO) बैठकीसाठी पाकिस्तानला जाणारे परराष्ट्र मंत्री एस जयशंकर यांनी शनिवारी सांगितले की, शेजारी देशासोबत कोणत्याही प्रकारची चर्चा करण्यासाठी ते तिथे जात नाही.

दिल्लीतील एका कार्यक्रमाला संबोधित करताना जयशंकर म्हणाले की, पाकिस्तानला जाण्याचे एकमेव कारण म्हणजे एससीओची बैठक. ही एक




बहुपक्षीय घटना आहे. ते तेथे भारत-पाक संबंधांवर चर्चा करणार नाहीत. परराष्ट्र मंत्री म्हणाले, "एससीओचा चांगला सदस्य असल्याने मी पाकिस्तानमधील बैठकीला उपस्थित राहणार आहे. मी एक सभ्य माणूस आहे, त्यामुळे तिथे गेल्यावर मी चांगले वागेन." याशिवाय सार्क सक्रिय नसल्याबद्दलही जयशंकर यांनी पाकिस्तानला जबाबदार धरले.

जयशंकर म्हणाले, पाकिस्तानमुळे सार्क पुढे जाऊ शकत नाही ते म्हणाले, "सार्क सध्या पुढे सरकत नाही आहे. आम्ही वर्षानुवर्षे त्याची एकही बैठक घेतली नाही. यामागे एकच कारण आहे आणि ते म्हणजे संघटनेचा एक सदस्य दुसरीकडे दहशतवादी हल्ले करत आहे. दहशतवाद हा एक मुद्दा आहे, ज्याकडे दुर्लक्ष केले जाऊ शकत नाही, असेही जयशंकर म्हणाले.

# इस्रायलने इराणच्या आण्विक तळावर हल्ला करावा : ट्रम्प

वृत्तसंस्था
वॉशिंग्टन

इराणच्या क्षेपणास्त्र हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून इस्रायलने त्यांच्या अणू तळावर हल्ला केला पाहिजे, असे अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटले आहे. न्यूज एजन्सी एएफपीने दिलेल्या माहितीनुसार, ट्रम्प यांनी शुक्रवारी नॉर्थ कॅरोलिनामध्ये निवडणूक प्रचारात हे विधान केले.



याआधी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जो बायडेन म्हणाले होते की, इस्रायलने इराणच्या आण्विक स्थळांवर हल्ला केल्यास अमेरिका त्याला पाठिंबा देणार नाही. बायडेन यांच्या या विधानावर ट्रम्प यांनी टीका केली. बायडेन चुकीचे आहे. अण्वस्त्रे हा आपल्यासाठी सर्वात मोठा धोका आहे. इराणकडे लवकरच अण्वस्त्रे असतील ज्यामुळे आपल्यासाठी समस्या निर्माण होतील. असा प्रश्न विचारला असता त्याचे उत्तर आधी तिथे बॉम्ब टाकायचे आणि नंतर इतर गोष्टींची काळजी करायचे असे असायला हवे होते.

इस्त्रायल-इराणमधील वाढता तणाव हे जग तिसऱ्या महायुद्धाकडे वाटचाल करत असल्याचे लक्षण असल्याचे ट्रम्प यांनी 2 दिवसांपूर्वी म्हटले होते. टाईम्स ऑफ इस्रायलच्या वृत्तानुसार, बायडेन यांनी शुक्रवारी सांगितले की, इराणच्या हल्ल्याला कसे प्रत्युत्तर द्यायचे हे इस्रायलने अद्याप ठरवलेले नाही. त्यांनी इस्रायलला इराणच्या तेलसाठ्यांवर हल्ला करू नये, असा सल्ला दिला आहे.

# भारताच्या मदतीने मॉरिशसने आपली बेटे मिळवली

## पंतप्रधान जगन्नाथ यांनी मोदींचे मानले आभार

वृत्तसंस्था
पोर्ट लुईस

मॉरिशसचे पंतप्रधान प्रविंद जुगनाथ यांनी ब्रिटनकडून चागोस बेट ताब्यात घेतल्यानंतर भारत सरकार आणि पंतप्रधान मोदी यांचे आभार मानले आहेत. त्यांनी शुक्रवारी सोशल मीडियावर लिहिले की, वसाहतवादाविरुद्धच्या लढाईत सर्व सहकारी देशांनी त्यांना साथ दिली आहे.

मीडिया रिपोर्ट्सनुसार, ब्रिटन आणि मॉरिशसमध्ये चागोस बेटावर जवळपास 50 वर्षांपासून वाद सुरू होता. या दोघांमध्ये हा करार व्हावा यासाठी भारत बऱ्याच दिवसांपासून प्रयत्न करत होता. करारानंतर भारताने दोन्ही पक्षांचे स्वागत केले आहे.

ब्रिटन आणि मॉरिशस यांनी 60 बेटांचा समावेश असलेल्या चागोस बेटांबाबत गुरुवारी एका करारावर स्वाक्षरी केली. त्यानुसार 'चागोस बेट' मॉरिशसला देण्यात येणार आहे. चागोस बेटांवर डिएगो गार्सिया बेट देखील आहे. अमेरिका आणि ब्रिटनने येथे संयुक्त लष्करी तळ स्थापन केला आहे. करारानुसार, यूएस-यूके तळ येथे 99 वर्षांसाठी राहील.

मॉरिशसला 1968 मध्ये ब्रिटनपासून स्वातंत्र्य मिळाले. पण, ब्रिटनने चागोस बेटावरील आपला दावा सोडला नाही. हे बेट आपलेच असल्याचा दावा मॉरिशसने केला. 2017 मध्ये, चागोस बेटावर संयुक्त राष्ट्रांमध्ये मतदान झाले. भारतासह 94 देशांनी मॉरिशसच्या बाजूने तर 15 देशांनी ब्रिटनच्या बाजूने मतदान केले. 2019 मध्ये, आंतरराष्ट्रीय न्यायालयाने देखील बेटाला मॉरिशसचा भाग घोषित केले.

मॉरिशसच्या स्वातंत्र्यापूर्वीच 1966 मध्ये अमेरिकेने ब्रिटनला 50 वर्षांच्या लीजवर दिएगो गार्सिया बेट दिले होते. 2016 मध्ये ही भाडेपट्टी आणखी 20 वर्षांसाठी वाढवण्यात आली. डिएगो गार्सियामध्ये अमेरिकेने हवाई आणि नौदल तळ सांभाळला आहे. यासाठी अमेरिकेने येथे स्थायिक झालेल्या हजारो लोकांना बेदखल करून ब्रिटन आणि मॉरिशसमध्ये पाठवले होते.

2022 मध्ये लीज ट्रस सरकारने मॉरिशसमध्ये बोलणी सुरू केली होती. मात्र, कंझर्व्हेटिव्ह पक्षाचे माजी पंतप्रधान बोरिस जॉन्सन यांनी या उपक्रमाला विरोध केला होता. जॉन्सन म्हणाले की, हे बेट त्यांच्या ताब्यात दिल्यानंतर चीन येथे तळ बांधू शकतो.

# प्रियकराने एकाचवेळी केली चौघांची हत्या; चिमुरड्या मुलींवरही घातल्या गोळ्या

वृत्तसंस्था
पाटणा

अमेठीमध्ये गुरुवारी शाळेतील शिक्षकाच्या संपूर्ण कुटुबांची हत्या करण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला. प्रेमप्रकरणातून ही हत्या झाल्याचं समोर आलं आहे. याप्रकरणी पोलिसांनी मुख्य संशयित म्हणून चंदन वर्माची ओळख पटवली असून शिक्षकाची बायको आणि चंदन एकमेकांच्या संपर्कात होते, असं पोलिसांनी सांगितलं.

एका सरकारी शाळेतील शिक्षक सुनील कुमार (३४) यांना १८ ऑगस्ट रोजी त्यांच्या पत्नीच्या प्रेमसंबंधांची माहिती मिळाली. त्यामुळे त्यांनी पत्नीला एससी/एसटी कायद्यांतर्गत चंदनविरुद्ध एफआयआर नोंदवायला लावला. चंदनने कुटुंबाला धमकी दिल्याचा आरोप या एफआयआरमधून केला गेला. तसंच, आमच्या कुटुंबाला कोणतीही इजा झाल्यास चंदनला जबाबदार धरण्यात यावं, असंही त्यांनी तक्रारीत नमूद केलं होतं.

ही तक्रार केल्यानंतर शिक्षकाची पत्नी आणि चंदन एकमेकांच्या संपर्कात नव्हते. परंतु, काही दिवसांनी चंदनने त्यांच्या कुटुंबाला त्रास देण्यास पुन्हा सुरुवात केली. सुनीलशी लग्न करण्यापूर्वी त्याच्या पत्नीचे चंदनबरोबर प्रेमसंबंध होते, असं पोलिसांनी सांगितलं.

गुरुवारी चंदनने पीडितेच्या घरात घुसून सुनील, त्याची पत्नी आणि दोन मुलींची हत्या केली. त्याने शिक्षकाला तीन वेळा, पत्नीला दोनवेळा आणि दोन्ही मुलींना प्रत्येक एक एक वेळा गोळ्या झाडल्या. एवढंच नव्हे तर हत्या करण्यापूर्वी त्याने स्टेटसला ठेवले होते की आज पाच लोकांचा मृत्यू होईल. हत्या केल्यानंतर जवळच असलेल्या मेडिकल स्टोअर चालवणाऱ्या राम मनोहर यादव याला गोळीबाराचा आवाज आला. त्यामुळे त्यांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या कुटुंबाला पाहून त्यांनी तत्काळ पोलिसांना बोलावलं.

# नऊ वर्षांच्या मुलीवर बलात्कार करून हत्या, संतप्त गावकऱ्यांनी पोलीस चौकीच पेटवली!

वृत्तसंस्था
कोलकाता

पश्चिम बंगालच्या दक्षिण २४ परगणा जिल्ह्यातील एका गावात एका नऊ वर्षांच्या मुलीवर बलात्कार करून हत्या केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. यामुळे संतप्त गावकऱ्यांनी शनिवारी सकाळी जिल्ह्यात संताप व्यक्त केला. संतप्त नागरिकांनी पोलिसांवर निष्क्रियतेचा आरोप करत पोलीस चौकी पेटवली. याप्रकरणी एकाला अटक करण्यात आली असून पोलिसांनी त्यांच्यावरील आरोप फेटाळून लावले आहेत. इंडियन एक्स्प्रेसने यासंदर्भातील वृत्त दिलं आहे.

मुलीचे कुटुंबीय आणि शेजाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, ती शुक्रवारी दुपारी कोचिंग सेंटरमध्ये गेली होती. ती घरी न परतल्याने कुटुंबीयांनी तिचा शोध सुरू केला. तिला शोधण्यात अयशस्वी झाल्यानंतर त्यांनी पोलिसांकडे ती हरवल्याची तक्रार नोंदवली. स्थानिक पोलिसांनी मात्र त्यांना दुसऱ्या पोलिस ठाण्यात



तक्रार दाखल करण्याचे निर्देश दिले."

शुक्रवारी रात्री नजीकच्या तलावात मुलीचा मृतदेह आढळून आल्याने परिसरात तणाव निर्माण झाला. शनिवारी सकाळी स्थानिक पोलीस ठाण्याभोवती झाडू, लाठ्या, बांबू घेऊन संतप्त जमाव जमा झाला. उपविभागीय पोलीस अधिकारी आतिश बिस्वास यांना घेराव घालण्यात आला. ग्रामस्थांनी पोलीस चौकीची तोडफोड करून ती पेटवून दिली, त्यामुळे अनेक महत्त्वाची कागदपत्रे नष्ट झाली. जमावाला पांगवण्यासाठी पोलिसांनी अखेर लाठीचार्ज केला. "आतापर्यंत एका व्यक्तीला अटक करण्यात आली आहे. यात आणखी कोणाचा सहभाग आहे का हे पाहणे बाकी आहे. परिसरातील परिस्थिती पूर्वपदावर आणण्याचे प्रयत्न सुरू आहेत. ते आमचे प्राधान्य आहे", असे एका वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्याने सांगितले.

पोलिसांवर निष्काळजीपणा आणि अकार्यक्षम असल्याचा आरोप करण्यात आला आहे. या आरोपांना उत्तर देताना पोलीस म्हणाले, "आम्ही आरोपीला ओळखले आहे आणि त्याला अटक केली आहे. त्याने कबूलही केले आहे. गुन्ह्याची माहिती मिळताच आम्ही तत्परतेने कार्यवाही केली. तरीही लोकांचे आरोप असतील तर आम्ही त्याकडेही नक्कीच लक्ष घालू."